# माझा मराठाचि बोलु



ज्ञानेश्वरांच्या जीवनावर आधारलेले तीन अंकी नाटक

**लेखक -पांडूरंग दे.सूर्यवंशी**

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# माझा मराठाची बोलु

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

a

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# माझा मराठाची बोलु

(ज्ञानेश्वरांच्या जीवनावर आधारित तीन अंकी नाटक)

कै. पांडुरंग सूर्यवंशी

# माझा मराठाची बोलु

(ज्ञानेश्वरांच्या जीवनावर आधारित तीन अंकी नाटक)

**लेखक : कै. पांडुरंग सूर्यवंशी**

द्वारा- कुमुद्वती भोसले

प्लॉट नंबर 15, दिप सेवक सोसायटी, आर. के. नगर, कोल्हापूर.

संपर्क – व्हॉट्स ऍप क्र. ९९७०१०३३७८

Email : bhosalekumudwati@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकांच्या वारसाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

his declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(For free ebooks send your name and place)


प्रकाशन : १७ ऑगस्ट २०२३

©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# कै. पांडुरंग देवाप्पा सूर्यवंशी

(जन्म -२३ जुलै.१९२६ मृत्यू -४ एप्रिल -१९७६.)



कवी व लेखक कै.पांडुरंग सूर्यवंशी यांचा जन्म-२३जुलै १९२६रोजी वडगांव, बेळगांव येथे झाला. कै. पांडुरंग सूर्यवंशी हे बेळगावचे सिद्धहस्त साहित्यिक आणि प्रतिभावान कवी होते.त्यांनी १९४८ते १९६५ या दरम्यान काही कविता,एक खंडकाव्य, लघुनिबंध व नाटक लिहिले. त्यापैकी कथा व कविता प्रसिद्ध झाल्या. त्यांच्या पहिल्याच लघुकथेला पहिले बक्षिस मिळाले होते. त्यांच्या कविता अभिरुची आणि सत्यकथा या दर्जेदार मासिकातून अग्रक्रमाने प्रसिद्ध होत होत्या. 'तुला कोणती आणु वानगी', 'माऊली', 'अभिसार' या कविता 'अभिरुची'त गाजल्या होत्या. 'वैशाखाचे स्वप्न' हे खंडकाव्य शार्दुलविक्रीडित या वृत्तात लिहून त्यांनी 'अभिरुची' कडे प्रसिद्धिसाठी पाठविले होते. परंतु अभिरुची मासिक बंद पडले आणि ते खंडकाव्य अप्रकाशित राहिले.या खंडकाव्याचे वैशिष्ट्य म्हणजे कै. माधव जुलियन यांच्या ' विरहतरंग' नंतरचे त्या वृत्तात लिहिलेले मराठीतील

ते दुसरे खंडकाव्य होते आणि त्या खंडकाव्याचा विषय हा अखंड आसामच्या डोंगराळ भागातील जनतेविषयी होता. रा. स्व. संघाचे ते निष्ठावंत कार्यकर्ते होते आणि संघाच्या नित्य कार्यामुळे त्यांच्याकडून विपूल साहित्य रचना झाली नाही. मात्र रा.स्व. संघाशी बालपणापासून संबंध आल्यामुळे त्यांच्या विचारात आणि शब्दात भावोत्कटता, लयबद्धता गतिमानता ओज व तेज हे गुण प्रकर्षाने जाणवत होते..

त्यांचे शिक्षण चिंतामणराव हायस्कूल, लिंगराज कॉलेज, लॉ कॉलेज आणि बी. टी. कॉलेज इथे होऊन त्यांनी 'एम. ए. एलएलबी. बी.एड. ' या पदव्या मिळवल्या होत्या. त्यानंतर चिंतामणराव हायस्कूल आणि नंतर सरदार्स हायस्कूलमध्ये त्यांनी शिक्षक म्हणून नोकरी केली. एक उत्तम व शिस्तप्रिय शिक्षक म्हणून त्यांनी नांव मिळविले होते.शिक्षक असतानाच वयाच्या ४० शीत ते दीर्घकाळ असाध्य व्याधीने आजारी पडले आणि किट्स, शेले, बालकवी यांच्याप्रमाणे साहित्यिक क्षेत्रात नाम कमावण्याची प्रतिभा असून सुद्धा सगळेच व्यर्थ गेले. साधारण साडेअकरा वर्षे ते अंथरुणाला खिळून होते.नंतर वयाच्या अवघ्या ५० व्या वर्षी म्हणजे ४एप्रिल १९७६ मध्ये ते वडगांव येथील आपल्या घरी निधन पावले.त्यामुळे त्यांचे सगळे साहित्य अप्रकाशित राहिले. कॉलेजमध्ये डॉक्टर ग्रामोपाध्ये,,

डॉ.वि.म.कुलकर्णीआणि कविमित्र शांताराम रामचंद्र यांच्या सहवासात राहून त्यांनी वाङमय प्रकाश मंडळातर्फे' नवधारा 'हा प्राथमिक काव्यसंग्रह आचार्य अत्रे व ग.त्र्यं माडखोलकर यांच्या उपस्थितीत बेळगांवच्या साहित्य संमेलनात प्रसिद्ध केला. या कविता संग्रहामध्ये देखील त्यांनी लिहिलेल्या चार ओळींची 'भाव कणिका' गाजली.

पांडुरंग सूर्यवंशी यांनी संत ज्ञानेश्वरांच्या जीवनावर आधारित लिहिलेले तीन अंकी नाटक 'माझा मराठाची बोलु' हे अप्रकाशित राहिले होते.ते 'वीरवाणी '१९९७ च्या दिवाळी अंकामध्ये प्रसिद्ध झालेले आहे."हे नाटक वैशिष्ट्यपूर्ण लिहिले आहे" असे प्रसिद्ध कादंबरीकार 'ना. सि.फडके' यांचा अभिप्राय असलेली टिपणी त्यांच्या हस्तलिखितावर आहे.

तसेच त्यांनी 'प्रक्षोभ' नावाचे १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यावर आधारित एक अभ्यासपूर्ण नाटक लिहिलेले आहे.ते दोन ऑगस्ट २०२२ रोजी www.esahity.com या वेबसाईटवर प्रकाशित झालेले आहे.

या व्यतिरिक्त 'चंद्रहास'हा त्यांचा काव्यसंग्रह ही आजारपणामुळे अप्रकाशित राहिला.यामध्ये त्याकाळी प्रसिद्ध झालेल्या काही

a

प्रकाशित कविता आहेत.व बाकीच्या अप्रकाशित कविता दोन्ही मिळून 'चंद्रहास 'काव्यसंग्रह प्रकाशित करत आहोत.वयाच्या २१/२२ व्या वर्षापासून त्यानी कविता केलेल्या दिसतात.

'हरपला पोलादी पुरुष ' ही कविता सरदार वल्लभभाई पटेल यांच्यावर त्यांच्या मृत्यूनंतर लिहिलेली आहे ती १८डिसे. १९५०साली 'प्रेरणा' साप्ताहिकात प्रसिद्ध झाली आहे.

'अंदमानातून' ही कविता सावरकरांवर त्याना अंदमानातील तुरुंगात शिक्षा दिल्याबद्दल लिहालेली आहे. ती २६ एप्रिल १९४६ रोजी ' संधि ' प्रातिनिधिक कविता संग्रहात प्रकाशित झाली आहे.

तसेच इतर काही कविता - 'कोष आता फोडिला हा,' 'प्रवासी', 'स्वप्नामागें ', 'संभवते तरि का-'.,'परि आज ', 'हिंदोळयावरची आस',. 'त्या सुंदरतेस्तव फिरतो-', ' असे आमुचा हाच संसार गे', 'उभय ध्रुवांच्या मध्यावरतीं ', 'मानवता ', 'हीच वांछा खुळी! ', 'या रंगभूमिवर ', 'काजवेच!...काजवेच!!', 'आरती ओवाळणे ही-,'

'मी हिन्दु......', ' माझा धर्म निराळा-', 'हा जीवनपथ', ''मन,श्रद्धा,बुद्धीपुन्हा निराश्रित झाली!', 'स्वप्नानी सखि निशा बहरली', तसेच 'भारताची भूपाळी ' या व अशा काही प्रकाशित कविता वेगवेगळया मासिकातून प्रसिद्ध झालेल्या आहेत.आता एकुण

a

१०० वर कविता 'चंद्रहास' या काव्यसंग्रहातून प्रसिद्ध व्हायच्या आहेत.त्यासाठी प्रयत्न चालू आहेत.

तसेच वर उल्लेख केलेले 'वैशाखाचे स्वप्नं'हे खंडकाव्य शार्दुल-विक्रीडित या अक्षरगण वृत्तात लिहिलेले म्हणजेच चार ओळीचे एक कडवे व प्रत्येक ओळीत १९अक्षरे याप्रमाणे ३१६ कडवी असलेले हे खंडकाव्य'लवकरच प्रसिद्ध करण्याच्या प्रयत्नात आहे.

'कवचकुंडले' नावाची लघुकथा अप्रकाशित आहे. त्याचप्रमाणे एक ऐतिहासिक नाटक शिवाजी महाराजांवर लिहायला घेतले होते पण दुर्दैवाने ते अर्धवट राहिले आहे.त्याचप्रमाणै सोम्या आणि गोम्या नावाची विनोदी एकांकिका १६/८/१९५६ ला लिहिली आहे. ती www.esahity.com या वेबसाईटवर २० एप्रिल २०२३ रोजी प्रकाशित आहे. ते जर आजारी पडले नसते तर आता एक नावाजलेले लेखक, नाटककार,कवि व कथाकार म्हणून चिरपरिचित असते.इथे नशिबानी त्यांना साथ दिली नाही असेच म्हणावे लागेल.

संपर्कासाठी पत्ता-

सौ.कुमुद्वती राजेंद्र भोसले


कोल्हापूर.

फोन नंबर-९९७०१०३३७८.

**माझा मराठाची बोलु च्या अस्तलिखितावर श्रेष्ठ लेखक श्री ना सि फडके यांचा अभिप्राय.**

**हे नाटक फार चांगले लिहिलेले आहे. वैशिष्ट्यपूर्ण आहे.**

**- ना. सि. फडके**



# माझा मराठाची बोलु

(ज्ञानेश्वरांच्या जीवनावर आधारित तीन अंकी नाटक)

लेखक - कै.पांडुरंग दे.सूर्यवंशी

_

## पात्रे प्रवेशानुसार

१) नागदेव

२) काळू

३) साळू

४) मुक्ता

५) निवृत्ती

६) सोपान

७) ज्ञानदेव

८) नारायणभट्ट

९) वासुदेवशास्त्री

१०) भिकंभट्ट

११) गणेशशास्त्री

१२) शंकरभट्ट

१३) त्रंबक शास्त्री

**अंक १ व २ स्थळ :-पैठण,**

**वेळ : सकाळी ६ ते ९**

**अंक ३- स्थळ :-नेवासे,**

**वेळ: प्रवेश १ सकाळी**

**प्रवेश२-संध्याकाळी.**

-

मराठा बोलीचें एक वाक्य

—

त्या थोर पुरुषाचे,त्या' बड्या बंडवाल्यातल्या 'पहिल्या बंडवाल्याचे,'त्या महाराष्ट्राच्या आचार्याचे ' अंशतः जरी व्यक्तीचित्रण, विभूती- पूजन आणि अध्यात्मज्ञानदर्शन प्रस्तुत ओबडधोबड नाट्यकृतीत मी यतार्थतेने करू शकलो आहे, असा रसिकांचा, सुज्ञांचा आणि आत्मज्ञानियांचा अभिप्राय ऐकू आला तरी त्या 'ज्ञानोबा माऊलीच्या' गाठोड्याची त्या 'योगीयांच्या राजाच्या ' ज्ञानसंपत्तीची 'भारवाही हमाली' करण्यात हा प्राणी यशस्वी झाला या विचाराने मी धन्यता पावेन.

पांडुरंग सूर्यवंशी.

_

**अंक:-१. प्रवेश -१**

(स्थळ:-. पैठण. काळू लोहाराचे राहते घर. आतील बाजूस काळू लोहाराचा 'कामीठा '. बाहेर ओसरी आणि ओसरी नंतर लगेच रस्ता. घर कुडाचे. जुने.

वेळ :-नुकतीच पहाट होत आहे.थंडीचा कडाका. पक्ष्यांचा किलबिलाट ऐकू येत आहे.एखाद दुसरा कोंबडा आरवतो आहे. मात्र त्या प्रभातसमयीच्या आवाजापेक्षाही काळू लोहाराच्या कामीठ्यात पेटलेल्या भट्टीचा आणि घणाचा आवाज होतो तो अधिक स्पष्ट ऐकू येत आहे. नागदेव माळेकार ओसरीवर येतो; आणि काळू लोहाराला हाका मारतो.)

नागदेव_काळूऽऽऽ अरं काळू ऽऽ··· अरची भनs घणाच्या घावातच रमलाया की ह्यो! ए ऽऽ काळया लव्हारा !.... अरं एऽऽ रेड्या. येड्या! (घणाचे आवाज थांबतात.)

काळू__कोण हाय त्ये?

नागदेव__अरंऽऽ मी!

काळू –-मी? मी म्हंजी कोन? काय नाव बिव न्हाई?

नागदेव–-अरे मी ऽऽ नागदेव! (ओसरीवर बसतो.)

काळू- नाग्या काय? मग बोंबलायला काय झालं तुला?

नागदेव-बोंबलू न्हाई तर काय करू? चांगली काळू म्हूनशान हाळया मारल्या पर 'ओ'हाय काय तुझी? तुला रेड्या म्हणलं, तेवाच तुझं कान खुललं! लोक रेड्या म्हणत्यात सारं तुला ; सरावाची हाळी ऐकल्याबिगार तुला ऐकू कुठलं येणार म्हणा!

काळू- आता भित्तूर येशील का भाईरच बस्शील बोंबलत?

नागदेव–-भित्तुर? न्हाई बा! वाईच तूच भाईर येनास (काळदेव हातात भला मोठा घण घेऊन बाहेर येतो). (नागदेव थंडीने काकडलेला आहे.थंडी लागत असल्याचे अविर्भाव त्याच्याकडून सुरुवातीपासूनच होत असतात. त्याच्या त्या काकडण्याला उद्देशून काळू बोलण्यास सुरुवात करतो)

काळू –-भाईर येयाचा अवकाश, लागलास का लटालटा कापाय्य?

नागदेव-तुला बघूनशानी नव्हं काय! थंडीच हाय तशी!

काळू –-मग कामीठात येया कुनी नग म्हटलं हुतं?आगिटा चांगला रसरसला हाय की!

नागदेव- मग तर आटपलंच!पकडलंस मला आन दिलंस फेकून भट्टीत तर करू काय? हंत हाय तोच बरा हाय!

काळू-तंगड्या तर शाबूत हैती न्हवं तुज्या? तस काही झालं असतं तर पळायला मोकळा हुतास की!

नागदेव- इसाची परीक्षा कोन खाऊन शानी करतं व्हय? भित्तूर आलो आन् दार लावून घेतलंस तर पळू कसा? अंगावर आलास आन् हंतं असलो म्हंजी निष्टून जायाची जरा आशा तरी असती;पन आत काय? मरानच!मागं न्हाई का तू दोनदा पाठी लागलतास?

काळू- मंग रेड्या का म्हनलातास तवां?

नागदेव-मी काय एकटाच म्हनतो तसं? सार जगच म्हनतं न्हवं?

काळू-जग मस्त सेण खातं! पन तू का?

नागदेव- काळू,कसं सांगू तुला? तुझी स्तुती हाय ती!

काळू –- स्तुती का?

नागदेव- हा!अक्षी इस्तुती! रेड्यावानी बलदंड गडी तू! उगाच न्हाई तुला रेडा म्हणत कुनी!

काळू–-पुरे,पुरे तुझं! मला शिकवू नगस! माज्या बायकोनं कधी माझी इस्तुती केलीय?पर ती बी मला रेडा म्हनती! तू आपला मला काळू म्हूनच हाक मार.न्हाइतर पाहिलंस? या घणाशी गाठ पडल!आलं ध्यानात?

नागदेव-आलं अक्षी पक्कं ध्येनात आलं! तुझा घण तुझ्या हाती नाचाय लागला म्हंजी काय व्हइल ते ठाव हाय मला! अगदीच काही मी नवखा नाही!

काळू-झालं तर मग!

नागदेव- पन गड्या,घर नाचवाय जरा धरबंद ठेवशील?कवा तुझ्या कामीठ्यात आलं की तुझं पित्त खवळतं ; तर कवा भाईर हतं बसलं तर डोकं भडकतं! ईळे धार लावून दे म्हनलं तरी तेच ; खिळं करून मागितलं तरीबी तेच! काही नको बा म्हनलं तरी तू चवताळतोसच ; आनं त्वांड मिटूनशानी बसलं तरी तुझं आपलं हडुत हूडूत हायच!

काळू⁻-आता तोंड आटप नाग्या! का टाळक्यात -

नागदेव- हा! हा! ह्येच. मला हेच म्हनायचं!आमावर एवढी टुरटुर करतुस; पर बाईले म्होरं कशी नांगी टाकतुस रं? अं? अक्षी पालीपुढं जणू इच्छुच! न्हवं?

काळू⁻- हा! हा! टिच्चून काढीन डोकं!लई बोलू नको! न्हाईतर थांब,तुझा गळाच दाबून मोकळा हुतो. (गळा दाबू लागतो) (नागदेवाचा आरडाओरडा ऐकून साळूबाई घरातून लगबगीने बाहेर येते. साळुबाई ही काळदेवाची बायको.)

साळु⁻-. (काळदेव लोहारास) ह्ये कसलं येड्यागत खेळ तुमचं! कामापरीस काम तर बोंबललच ; आन् घरात अजून ताज्या पान्याचा एक टिप्पूस बी आणला न्हाई तो न्हाईच! ह्ये का करनं हाय का काय हाय? आ? पानी कवा आणून देणार मला?

काळू –-(गळा दाबण्यासाठी शिवशिवणारे हात नाईलाजाने मागं घेतो आणि झटक्यात गोगलगायीप्रमाणं नम्र होतो) पानी!......आ.....हां, व्हय, व्हय. पानी आनायचंय नागो, गोदावरीचं! आनतो आनतो बरं कारभारनी!

साळू - कवा? माझा जीव गेल्यावर तर न्हवं?

काळू - अग,पानी पानी काय करतीयास? पानीच पानी आनीन चुटकीसरशी.ती पल्याडली पखाल बघितलीस का? ती दिखील भरूनशान एकदम पानी आननारं ताकदवान् दंड हैत ह्ये!

साळू –-ठाव हाय मला त्ये.पन ती ताकद हतं लोकांचे गळे दाबण्यात वाया जातीया ना! आता उठा. पानी आना आदुगर!

नागदेव- कसं म्हन्ला तुम्ही आई! जारं आदुगर पानी आन, अन मग होवं तर माझा गळा दाब! माझं पराण जाताना मी पानी मागितलं, तर ते बी देता येऊ न्हवं म्हून पानी आनन्याच्या अदुगरच माझा गळा दाबतुस जनू! मागल्या जन्मी मांग तर नव्हतास तू?

काळू -(दात ओठ खाऊन)ही संबुर नसती तर अक्षी पानी घातल्याबिगारच तुझा गळा दाबला असता! पन करनार काय? (साळूस उद्देशून) पानी आनतो मी.(नागदेवास)तू कारं आलातास इतक्या येरवाळीच? (साळूस)ह्याचं एवढं काम इचारून आनतोच हां पानी! जा तू.

नागदेव –- (लगबगीनं गडबडून) नका, नका आई....भित्तूर जाऊ नका!तुम्ही घरात गेलात की हंतं माझी शंभर वर्ष भरलीच.!

साळू –- आन् मी बरी जाईन! उठता की नाही आदुगर?

काळू -. (नाइलाजाने). पण, व्हय,व्हय उठलोच.

काळू - पन दम धरा.काय काम हुतं तुझं माळेकारा? तुला उगाच खोळंबून ऱ्हायला नगं!

नागदेव- आज दहा येळा येऊन झालं आई! ह्याच्यापाशी इळं कराया दिल्याती. पर जवा येईन का तंवा ह्यो गडी इळयाला हात लावण्यापक्षी माझ्या गळयालाच हात घालतु न्हवं!

साळू - अवलक्षणीच हैती ह्ये. काम कराया नग येळेवर, नुसतं रेड्यावानी बसल्यात! रेड्यावानी का? रेडाच हायती हे! फुका न्हाई अख्ख पैठण रेडा म्हनतं!

काळू –- (विषय बदलण्यासाठी) नाग्या, आनी ये कंदीतरी! पानी आनतु आता आदुगर! पानीआनस्तोवर अशी बिनपान्यानंच चालंल माझी!पुढच्या येळंला नक्की देतो इळं!

a

(साळूस) निघालोच ग पानी आनाया.(साळू आत जाते)

नागदेव –- दोस्त,तुला वाइच छेडलं! पर राग मानू नगस हं! होवं तर दंडवत घालतु तुला! (शिरसाष्टांग नमस्कार घालतो.)

काळू –- आदुगर खेटरानं मारून मग नमस्कार करायची ही तुझी बुद्धी ब्येस हाय! असं वाटतं की तुझं डोकं असंच ठेचावं हतं! (घण उचलू लागतो)

नागदेव- (एकदम धडपडून उठत)दम, दम! मी कशापायी आलुतो त्ये खरं सांगतु आता तुला!

काळू–- इळं मागाया न्हवं?

नागदेव- न्हवं! ते सम्द खोटं!आता खरं ऐक.

काळू –- अक्षी खरं?

नाग- हा.अक्षी खरं. एक गंमत आहे ती!

काळू–-. (राग पार टाकून)गंमत? काय म्हनतुस काय?

नागू- त्येच ऐक.आज गावात कोन येनार हैती ठाव हाय का?

काळू- असल्या गोष्टी जर मला उमजत्या तर अख्खा पैठण गावानं मला रेडा म्हणलं
असतं?

नाग- (हसून) मग बरंच कळतं की तुला! तर सांगतु काय? ऐक. "अगं ग म्हशी मला का नेशी" म्हणत गेल्याला तो इठ्ठलपंत! त्यो रे त्यो,संसार सोडून बावा बनला, पन पुन्हा बायको बरोबर संसार केला त्यो इठ्ठलपंत!आलं धेनात?

काळू- (डोकं खाजवतो) अं? न्हाय बा!

नागदेव- अरं ती रुक्मिणीबाई अन त्यो इठ्ठलपंत?

काळू- (एकदम कळल्यासारखं करून) हा, हा! त्यो पंढरीचा?

नाग- हात लेका! त्यो देव. मी म्हनतु ती माणसं हुती त्येनी नदीत जीव दिला.

काळू⁻- हां! आत्ता उमगलं बघ!जीव दिला म्हनल्यावर उमगलं! पन जीव कशा पायी दिला रं?

नाग –- खरं कारन त्यो इठ्ठल आन् रुक्मिनीच जानं! पर लोक म्हनत्यात,ते दोघं साऱ्या बामणांच्या जाचालाच कंट्टाळलं!अन् म्हूनशान त्येनी इंदरानी नदीत का कुठंशी उडी घेतली.

काळू –- अस्सं? बघ बा! मग त्येचं आत्ता काय?

नाग- त्येंची चार प्वारं हतं पैठनात आज येनार हैती.

का्ळू⁻-. मंग काय त्येंचं टाळकं फोडायचं हाय? ते काम लागलं माझ्याकडं!

नाग- छे,रं! तुला अक्षी टाळकंच कसं ते न्हाई! (चूक झाल्यामुळे जीभ चावतो.काळू संतापतो)न्हवं, न्हवं -हाय,हाय! सांगायचं काय? तर ती समदी मिळून आल्याती हतं सुद्धिपत्तर मागाय बरामणांच्याकडं!

काळू⁻- आं? (आ वासतो) काय म्हणालास?

नागदेव –- अरं त्येस्नी वाळीत टाकलंया सम्द्या बरामणानी

काळू ‑- अस्सं, अस्सं! मग त्या बामणांची टाळकी सडकून काढू? लागलं! त्ये बी आपल्याकडे लागलं!

नागदेव- (त्रासून) तुला टाळकं -(एकदम आवरून) म्हंजे टाळक सडकन्याबिगार दूसरं काही दिसतच न्हाई जनू! तसलं कांहीच करू नगस तू! बायकोनं सांगितल्या परमान तू आपला पानी आन! पन जाता जाता आपन थोडा येळ थांबू! गंमत बघू! इद्वानांची सभा हाय गणेशाच्या देवळात!आपन ततली गंमत बघू वाईच! काय?

काळू –- व्हय,व्हय!चल्!(आधीरतेनं तसाच जाण्यासाठी सिद्ध होतो)

नाग –- पन् असंच कुठं निगालास? पानी आनाया काय घेशील की तसाच? मुंडासं- बिंदास बांध!

काळू –-. अरं खरंच की!इसरलोच पान्याचं! काय रं! तथं जरा येळ मोडंल न्हवं देवळात?

नाग –- व्हय. का?

काळू –- तर मग असं करतु. पखालच घेतो पल्याडली डोईवर. म्हंजी पानी एकदम आनता येईल!

नाग –- ठीक.ठीक.चल.

काळू –- (पखाल उचलून डोकीवर दुमडून बसवतो. आतील दिशेने बायकोस उद्दशून)
पानी आनाया निघालो बरं!

साळू ⁻- (आतून) बिगीनं या!न्हाईतर, बसाल कुटं तरी ऊन खात.!

काळू –- बरं बरं! (काळू व नागदेव जातात)

## प्रवेश २

–

(स्थळ :- पैठण. गावाबाहेरील राईतील एका वटवृक्षाच्या तळवटी निवृत्तीनाथ,ज्ञानदेव आणि सोपान झोपेचं सोंग करून अंथरुणावर पडलेले आहेत. मुक्ताबाई कडेवर लहानशी कळशी घेऊन प्रवेश करते.

वेळ:- सुमारे सकाळचे ६ वाजले आहेत)

मुक्ता –- (पाणी भरून आणलेला मातीचा घडा खाली ठेवीत) हं! अजून डाराडूर घोरत पडला आहात तर! म्हटलं, सखे भाऊ. 'एका परीस तिघं ; पलीकडच्या नदीचं पाणी आणायला हातभार लावाल ; पण शपथ! आम्हा बहिणींचच काळीज मेलं मऊ! साखर झोपेत आहेत,असू दे म्हणून एकटीच गेले पाणवठ्यावर ; पण परत येऊन पाहते तर अजून तुमच्या उठण्याची चिन्ह नाहीत! अहो उठा. पहा. आपण ज्या वटवृक्षाखाली खुशाल घोरत पडला आहा, त्याच्या फांद्या फांद्यावरचे हे चित्रविचित्र पक्षी हृदयंगमरवानं प्रभात -गीत गात आहेत.आपल्या पंखाच्या फडफडीनं आपल्याच गायनाला ताल धरीत आहेत! पलीकडून येणारा रानमाळावरचा प्रसन्न वारा तुमच्यावर सुगंधाची उधळण करीत आहे; फुलाफुलांवर भुंग्यांचा, मधमाशांचा गुंजारव चालला आहे! हे विश्वातलं अगम्य संगीत तुम्हाला झोपेतून जाग आणण्यासाठी छेडलं जात आहे बरं! अरे

a

अजून तुम्ही हालचाल करीत नाही! (एकेकास हलवीत) अहो निवृत्तीनाथा, ज्ञानेश्वरा, अरे सोपान. उठा.उठा. तुमच्यासाठी पाणी आणलय मी तोंड धुण्यासाठी! उठा! (सगळे ठरल्यासारखे खडबडून उठतात.)

निवृत्ती –- काय कटकट आहे ग? झोपू देशील स्वस्त की नाही? सर्व जगानं तर आमची झोप उडवलीच आहे; त्यात तुझीही भर! बहीण आहेस की,

मुक्ता –- पुरे तुझं! डोळे उघडून तरी बघशील? चांगलं फटफटले आहे!

निवृत्ति –- हो का? (डोळे उघडतात) खरं आहे आजीबाई!

मुक्ता –- वर मीच आजीबाई काय?

सोपान- (एकदम टाळ्या पिटीत) कसं फसवलं! कसं फसवलं!

मुक्ता –- (रडकुंडीस येऊन) काय रे फसवलं? (सारे जण हसू लागतात) हसता होय आणखी वर? (टाळी वाजवीत) थांबा तोंड धुण्याला पाणीच देत नाही जा! नागिणीसारखी बसून राहते मडक्याजवळ.

(पुन्हा हसतात)खोटं नाही.खरंच! हे पाहा.

a

(मडक्याजवळ जाऊन गाल फुगवून, दोन्ही हात डाव्या कमरेवर टेकवून उभी राहाते) आणखी हसता काय? मडक्याला हात घालायला तर या- चांगला कडकडून चावाच घेते! (सारेजण पोट धरधरून हसतात.मुक्ता जास्तच चिडते.फुरगटून मडक्या जवळ बसत) आम्ही बोलतच नाही जा कुणाशी!

निवृत्ती-(समजूत काढीत)अगदी वेडी रे वेडी.अग आम्ही का हसलो, ठाऊक आहे?

(मुक्ता दुसरीकडे तोंड फिरवते) अगं इकडे पहा तर खरं! निदान ऐक ; अग आम्ही हसलो, ते आम्हाला तोंड धुण्याला तू पाणी आणलंस, म्हणून!

मुक्ता⁻- (एकदम वळून) का रे बाबा? माझं कौतुक करायचं दूरच. पण उलट थट्टा सुचली होय तुम्हाला! हा ज्ञानदेव पहा. सर्वात जास्त हसत सुटला आहे. (चिडवीत) ज्ञानोबा, बैलोबा - रेडोबा - रेड्या- रेड्या -रेडिटल्या!!

सोपान –- मुक्ता,अगं वेडे, ज्ञानदेव चिडतील असं तुला वाटलं होय? 'हो,मी रेडाच आहे!'असं म्हणून मोकळं होतील!

ज्ञानेश्वर- बरोबर! रेड्यात आणि माझ्यात काही भेद नाही, हे मुक्ताला काय सांगायला हवं?

सोपान- पण आम्ही का हसत होतो, हे तरी तिला सांगायला हवंच!

ज्ञानेश्वर- अगं छबडे,आम्ही अजून झोपलो होतो या तुझ्या समजायला आम्ही हसत होतो!

मुक्ता⁻- प्रत्यक्ष डोळ्यांनी तुम्हाला झोपलेलं पाहूनही तुम्ही मलाच वेडी ठरविता आहात की रे!

निवृत्ती⁻- अग सोंग होतं ते! तू उठून नदीकडे निघाल्यावर तुझ्या मागोमाग आम्ही सुद्धा नदीवर आलो. तोंडं धुतली, आंघोळी केल्या. आणि तुझ्या अगोदर पुन्हा इथं दत्त!

ज्ञानदेव- तू येणार मुंगीच्या पावलानं! त्या अवधीत मीआणि नाथांनी योगासन सुद्धा उरकली.

सोपान- मी तर तुझ्या मागोमागच होतो. तू जशी या वृक्षाजवळ आलीस तशी मी घाई करून माझी झोपण्याची जागा गाठली आणि डाराडूर झोपल्याचं सोंग केलं!

ज्ञानदेव-आणि आम्ही दोघं शेवटचं शवासन करीत होतो!

मुक्ता-अरे लबाडानो, अस्सं काय? मी आपली उगीचच धावपळ केली तर! आणि किती दुष्ट आहात रे तुम्ही! मला किती वाटतं तुमचं किती करावंस! तुमची वस्त्र धुवावीत,तुम्हाला न्हाऊ घालावं,झालंच तर-काय काय म्हणून सांगू?

ज्ञानदेव-का? सांग ना! 'ये ग काऊ ये ग चिऊ' म्हणून घास भरवावा! (हसतात)

मुक्ता- हो!हो! घास भरवावा! का?

(सर्वजण हसतात) नशीब! तुमचं अन्न तरी मला शिजवू देता आणि वाढू देता! काल तुम्ही चालून चालून किती दमला होता! म्हटलं तुमची अंथरूणं घालून देईन,तुमचे पाय चांगले तुडविन; पण तुम्ही कसले खाष्ट! निदान आता अंथरूण तरी गुंडाळून ठेवते मी! उठा. (अंथरुणाकडे पाहून) पण हे रे काय? ही तीनच तर अंथरूणं दिसताहेत! चौथं काय झालं? आम्ही सारी नदीवर गेल्यावर कुण्या भामट्र्यान चोरून तर नेलं नसेल? (सर्वजण मुद्रा गंभीर करतात)

निवृत्ती-(एका अंथरुणाकडे अंगुली दाखवून) हे माझं.

सोपान-(दुसऱ्याकडे बोट दाखवून) आणि ते माझं.

मुक्ता- आणि ते माझं

ज्ञानदेव-माझं? माझंच नाही! पण ही अंथरुणाची गोष्ट माझ्या किंवा तुम्हा दोघांच्यासुद्धा डोळयांना बरी खुपली नाही ती! नेमकी मुक्ताच्या डोळयांना चटकन उमगली अं?

सोपान-उमगायचीच! मुक्ता स्त्री ना! तिच्याच डोळयाना या गोष्टी आढळायच्या! काल रात्री आमची अंथरूण घालायचं काम कमी पडलं होतं, आज अंथरूण काढायचं काम कमी पडलं असेल! आम्हा भावांचं कित्ती कित्ती करावंसं वाटत तिला! (हसतात.)

ज्ञानदेव-थांबा, तिचंही पांघरूण मीच गुंडाळतो म्हणजे-

मुक्ता- (अंथरुणाला ज्ञानदेवांनी हात लावलेला पाहून) अरे,वा रे देवा! मी बरी तुला काढू देईन! चल सोड ते माझं पांघरूण!

ज्ञानदेव-(काही आश्चर्याची गोष्ट दिसल्यासारखी मुद्रा करून)अरे वा! तरीच! म्हटलं ही आपल्या अंथरुणाला मला का हात लावू देत नाही! ते पहा, निवृत्तीनाथा पाहिलं काय आहे हे?

a

निवृत्ती-(धावत जाऊन)पाहू,पाहू! (एका हाताने कृष्णाजीन वर उचलीत) हे तर तुझं अंथरावयाचं कृष्णाजीन!

ज्ञानदेव-(पासोडी वर उचलून दाखवीत) आणि हे पहा! माझी पासोडीही हीनंच लाटलेली आहे!अग लुच्चे! माझं अंथरूण लाटणारा भामटा तूच तर! रात्रभर नुसता थंडीत कुडकुडतोय मी! मला वार्ताही नाही! झोपेत मी लोळत अंथरुणाबाहेर गेलो असेन आणि मग हिनं माझं अंथरूण पळवलं असेल! आणि म्हणे (वेडावीत) तुम्ही माझे सख्खे भाऊ; तुमचं कित्ती कित्ती करावसं वाटतं मला! वा रे सख्खी बहिण! माझं अंग ठणकतं कां ते आता उमगलं मला! नुसता गारठून गेलोय मी कालच्या रात्रीच्या थंडीने!

मुक्ता- (रडवे तोंड करते) मी नाही हं नाथा, असं केलं.हे हो काय देवा? असा खोटा आरोप का करता? मल रडू येईल आता अशांन! मला यातलं काहीही ठाऊक नाही!

ज्ञानदेव- मग तुझच कसं लक्ष गेलं ग अंथरुणाकडे?

मुक्ता-(चिडून) सांगा रे खरं खरं कोणी केलं हे? नाही तर ज्ञान्या तुझाच खेळ असेल! तुला कुठली आलीय थंडी! रेड्याच्या कातड्याचा आहेस तू!

a

ज्ञानदेव-चोर तो चोर आणि वर शिरजोर म्हणतात,ते अशाच बोलण्याला बरं मुक्ता!

(एव्हाना मुक्ताच्या डोळयातून टिपं गळू लागतात) अरर्र् या गंगायमुना ग कशाला?आता मात्र तुला शरण आलंच पाहिजे बाई! कबूल, कबूल! एकदम कबूल! रात्रीच्या थंडीमध्ये मला मध्येच जाग आली! पाहतो तो तू ही पोटात पाय घेऊन गोळा झाली होतीस! तेव्हा हळूच तुला उचललं! माझं कृष्णाजीन तुझ्या अंथरुणावर घातलं.माझी पासोडी तुझ्या पासोडीला जोडली आणि टाकलं तुला गुंडाळून! नंतर तुला ऊब आली आणि तू अगदी निवांत झोपलीस आणि मग अस्मादिकांच्या स्वारीने माझ्याअंथरूण- पांघरूणात येथेच ताणून दिली!

सोपान-तुझं अंथरूण पांघरूण? ते तर मुक्ताला दिलंस ना?

ज्ञानदेव- अरे मला काय तोटा अंथरुण पांघरुणाला? माझी साक्षात गुरुमाऊली माझ्याजवळ असताना मला कसली उणिव? सद्गुरु निवृत्तीनाथांची कृपादृष्टी हे सर्व विश्वाला ऊब देणारं एक विशाल अंथरूण पांघरूण आहे! त्यांनी आपल्या स्नेहपल्लवान मला सदैव पांघुरविलेलं आहे. या गुरुमाऊलीच्याच कृपाबळाने तहानेसाठी आम्ही तहानच पितो आणि भूक लागली असता भूकच खातो. इतकच काय, थंडीचीच

a

आम्ही बंडी करतो, उन्हाळ्यालाच पांघरून घेतो आणि पावसाळ्याचेच घर करून, त्यात राहतो!

मुक्ता-अरे वा! बऱ्याच गोष्टी ऐकायला लावतो आहेस रे! पण नाथा,असलं हे जगावेगळं सामर्थ्य तू याला कशाला दिलंस?

निवृत्ती- मी त्याला काहीही दिलेलं नाही! दिलं असेन तर अगदीच अल्प दिलेलं असेन. बाकी त्याचीच सारी कमाई आहे ती!

मुक्ता –- खरं बोला ज्ञानेश्वरा! तुम्हाला थंडी लागली नाही काल?

ज्ञानदेव- हे मलाच काय म्हणून विचारतेस तू?ज्या वृक्षाखाली आपण निद्रा घेतली आणि आता आहोत त्या वृक्षाला सुद्धा हाच प्रश्न विचार ना! त्या वृक्षराजाला जर थंडी लागली असेल तर मलाही लागली असेल असं समज!

मुक्ता- म्हणजे?

ज्ञानदेव–-मुक्ता,

हे विश्वचि माझे घर | ऐसी मति जयाची स्थिर किंबहुना चराचर | आपण जाहला ||

a

या वृत्तीची प्रचीती घे म्हणजे कळेल.!मग काल रात्री मी स्वतः:च थंडी होऊन या विश्वात हिंडत होतो, हे तुला वेगळं सांगायला लागणार नाही!

मुक्ता-ज्ञानराजा तुम्ही असं बोलू लागला की नुसतं ऐकत राहावं असं वाटतं! सारं भान हरपून जातं! साहित्यानं तुमच्या जीव्हाग्रावर वसतीच केली आहे जणू! बोला,असंच आणखी काही बोला! खरंच तुम्ही किती थोर आहात!

ज्ञानदेव–-यात माझी कसली मातीची थोरवी!

जो सर्वोपकारे समर्थु | सद्गुरु श्री निवृत्तीनाथु |
राहटत असे मजहि आतू | रीगावया ||
म्हणोनि माझे नित्य नवे| श्वासोच्छवासही प्रबंध होवावे |
श्रीगुरुकृपा काय नोहे| ज्ञानदेवो म्हणे ||

निवृत्ती-ज्ञानदेवा, तुझं हे गुरुपुराण आवरतं घे! नाहीतर मुक्तानं 'बोलत रहा' च्या दिलेल्या प्रशस्तीपत्राने भुरळून जाऊन इथेच बोलत बसशील!

ज्ञानदेव-जी -जी,आपली आज्ञा शिरसावंद्य! आता मी स्वस्त बसतो!

निवृत्ती- माझ्या म्हणण्याचा तसा आशय नाही. मुक्तानं दिलेलं प्रशस्तीपत्र तू अवश्य स्वीकार ; पण पैठणच्या ब्रह्मवृंदाबरोबर वादविवाद करून

a

आपलं शुद्धिपत्र मिळविण्यासाठी वेळेवर जायला हवं हेही लक्षात ठेव.

ज्ञानदेव-शुद्धिपत्र मागण्याच्या गोष्टीत माझ्या मनात तर्ककुतर्काची दुष्ट सावजे गदारोळ घालीत आहेत. त्यामुळेच गेल्या रात्री मला नीट झोपही आली नाही.

मुक्ता- मग थंडीने जाग आली हे खोटंच!

ज्ञानेश्वर- हो.

निवृत्ती–-मग अजून पर्यंत बोलला नाहीस ते!

ज्ञानेश्वर–- या शुद्धिपत्र प्रकरणाचा एवढा प्रपंच होईल असं वाटलं नाही सुरुवातीला! वाटलं होतं की आळंदीच्या ब्राह्मणांसमोरच काय तो निकाल लागून तिथेच प्रकरण थांबेल! पण आळंदीच्या ब्राह्मणांनी पैठणच्या ब्राह्मणांकडे बोट दाखविलं; आणि तिथेही खटपट करायचीच असा तुमचा निश्चय

ऐकला! गुरुदेवा, तुमचा निश्चय आणि आग्रह पाहून मी माझ्या मनाला कोलदांडा घातला.पण आता राहवत नाही. (कळवळयाने) नाथ, क्षमा असावी.माझ्या शंका मला व्यक्तऊ द्या!

निवृत्ती--(प्रेमळपणे) ज्ञानराजा, माझ्यापाशी -

ज्ञानेश्वर--जी. तुमच्याशी स्पष्ट बोलायचं नाही तर कुणाशी? हे तर खरंच! म्हणून आता स्पष्टच बोलतो.

निवृत्ती-अगदी स्पष्ट - स्पष्ट बोल.

ज्ञानेश्वर-खरोखर, आता आपल्याला शुद्धिपत्राची आवश्यकता आहे असं मला वाटत नाही.

निवृत्ती- वा! तू तर अगदी मुळांनाच हात घातलास हा! गहिनीनाथांच्या निवांत गुहेचा निवारा सोडून मी जो आळंदीपासून पैठणपर्यंत एवढा ब्रह्मांडव्याप रचिला तो सर्व व्यर्थच!

मुक्ता-- ज्ञानदेवांच्या म्हणण्याचा असा एकदम विपरीत अर्थ नको करू नाथा. मलाहि असंच वाटतं -.

सोपान–-(पुढे बोलू न देता वेडावून) की आता आपल्याला शुद्धिपत्राची आवश्यकता नाही! अहा ग वा थेरडे! थोरांच्या बोलण्यात तोंड खूपसायला तुला ग कशाला पाहिजे?

मुक्ता- मी बोलणार! तुला काय
करायचंय? म्हणे (वेडावीत) थोरांच्या बोलण्यात तोंड खूपसायला तुला ग कशाला पाहिजे? मोठा आलाय थेरडा!

निवृत्ती- अरे,तुम्ही मध्येच काय भांडता असे? बोलू दे रे सोपान तिला!तू आपला स्वस्त ऐक पाहू!

सोपान–- जी.

निवृत्ती–- बोल ग तू! तो आपलं गमतीने म्हणाला.

मुक्ता- आपण हे शुद्धिपत्र मिळवायचं ते मुख्यतः कशासाठी? तुम्हा सर्वांच्या मुंजी व्हाव्यात म्हणूनच ना?

निवृत्ती–- आमचं मौजीबंधन व्हावं हा एक मुख्य उद्देश. मौंजीबंधन हा आमचा एक पवित्र संस्कार. शिवाय तो संस्कार आम्हाला व्हावा यासाठी

आमचे माता-पिता यावज्जीव तगमगले! आमची अवहेलना सहन करवेना म्हणूनच ना त्यांनी प्रयागला जाऊन त्रिवेणीत सदेह आत्मार्पण केलं? (भावविवशतेने) अहह! त्या दूर्दिनाची दुःखद आठवण झाली म्हणजे अंतकरण कसं फाटून निघतं! वाटतं की क्षणापूर्वीच त्या दुर्दैवाचं वज्र कोसळलं आहे आणि निखळून पडलेल्या आकाशाखाली आम्ही सापडलो आहोत! (सर्वजण काही क्षण सद्गतीत अंतःकरणाने स्तब्ध,निश्चल होतात. निवृत्ती लगेच भान सावरतात. पण सर्वांची स्तब्धता असह्य होऊन) अरे बोला- ज्ञानेश्वरा, कोणी, काहीतरी बोला असे स्तब्ध काय बसता? ही शांतता असह्य आहे!!

ज्ञानेश्वर-आमच्या मातापित्यांचं आत्मार्पण! पण त्या आत्मार्पणानंतर तरी आळंदीच्या त्या पाषाण हृदयी ब्राह्मणांनी आपला निर्णय बदलला का? संन्याशाच्या मुलांचे संस्कार व्हायचे नाहीत हा त्यांचा निर्णय कायम तो कायम! आम्ही परत त्यांच्यापाशी पदर पसरून शुद्धिपत्राची भीक मागितली. पण व्यर्थ! आमच्या इवल्या इवल्या शोकानं अश्रूमलिन झालेल्या मुद्रा पाहून आपल्या कातळाच्या काळजाला कदाचित कणव येईल म्हणून त्यांनी दुसराच मार्ग काढला! पैठणचा ब्रह्मवृंद आमचा निर्णय करण्याला विशेष अधिकारी व विशेष विद्वान असे सांगून त्यांनी आमची बोळवण केली.पण हे सारं मृगजळ आहे! ब्रह्मवृंद विशेष अधिकारी व विशेष

a

विद्वान याचा अर्थ सर्वात कठीण आणि काळा कुळकुळीत दगड! हा पैठणचा ब्रह्मवृंद आम्हाला अनुकूल निर्णय देईल, हे कालत्रयीही शक्य
नाही! कोळसा उगाळावा तेवढा काळाच!!

निवृत्ती-म्हणून का आरंभीलेलं कर्म अर्धवटच सोडायचं? लक्षात ठेव की,आपण नुसतेच जर मूग गिळून स्वस्थ बसलो तर आमच्या कपाळी मारला गेलेला हा काळा डाग आम्हाला मान्यच आहे, असा सर्व समाजाचाही समज होईल!आमच्या आई-वडिलांवर अन्याय झाला आहे,हे आम्ही सांगितलं नाही तर कोण सांगेल? आमच्या पित्यानं संन्यास घेऊन पुन्हा संसारात प्रवेश केला हा काही त्यांचा गुन्हा नव्हे! श्रीपादयतींची आज्ञा म्हणजे वेदवाक्य! शिवाय परिस्थितीच असामान्य असल्यामुळे, श्रीपादयतीनीही असामान्य आज्ञा- संन्याशाला पुन्हा संसार करण्याची आज्ञा केली! कर्मठ ब्राह्मण मूर्ख आहेतआणि म्हणून हे त्यांना समजत नाही! निदान विठ्ठलपंतांची आम्ही अजाण मुलं, निष्पाप, निरपराध आहोत, हे रेड्या प्रमाणे आडमुठे असलेल्या या कर्मठशास्त्री पंडितांना समजलं नाही! आता ही ओळख पटविण्यासाठी आम्ही पुढे सरसावलो नाही तर अन्य कोण पुढे येणार?

सोपान- स्वतः मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही याचा अनुभव आम्ही घेऊन चुकलोच आहोत! आई-बापाविना पोरकी बनून आम्ही आपेगावी आमच्या नातलगांकडे मोठ्या आशेने गेलो.पण तिथं अनुभव काय आला? आश्रय मागताच, सर्वांनी सुस्कारे सोडले आणि वाजविली मात्र नकार घंटा!अखेर तुम्ही दोघांनी कोरान्न मागून आणावं आणि तोपर्यंत एखाद्या वृक्षाखाली अगर धर्मशाळेत मी मुक्ताला सांभाळीत वेळ काढावा, असली कठोर तपश्चर्या आपल्यालाच करावी लागली ना? म्हणून आपल्या जीवितावर लादलेलं हे लांछनाचं ओझं आम्हीच फेकून दिलं पाहिजे

मुक्ता–-पण हे करण्यासाठी अगोदर ब्रह्मवृंदाच्या पाषाणाला पाझर फोडायला हवा! म्हणजेच, अत्यंत जहरी सर्पाला विषा ऐवजी अमृताच्या चुळा टाकायला लावलं पाहिजे, याची वाट काय?

निवृत्ती- 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन!' हे गीतामृत आकंठ प्यायलेल्या या ज्ञानेश्वराला हा पेच पडणार नाही मुक्ता! निदान मला तरी यशापयशाचा पेच कधीच पडणार नाही! श्री गहिनीनाथसद्गुरूंचा अनुग्रह होऊन मला त्यांचा उपदेश मिळाला; आणि त्यांच्या सानिध्यात ज्ञान संपादिल्यावर आपण सशास्त्र मुले आहोत, हे सिद्ध करण्याचं मी ठरवलं.असं ठरवितांना यशापयशाची तमा मी कधीच बाळगिली नव्हती! मला फक्त एवढं दिसत होतं की, समाजबंधनं ही

फाजील कडक झाली आहेत; आणि न्यायापेक्षा तंत्राला अधिक महत्त्व आलं आहे! अशी ही परिस्थिती प्राप्त झाली म्हणजे कुणी तरी त्याविरुद्ध बंड पुकारतोच! मीच बंड का पुकारू नये?असा विचार माझ्या मनात आला आणि त्याच बंडासाठी मी भूमी तयार केली.आता ज्ञानेशानं बंडाचा झेंडा उभारून गर्जना करावी अशी माझी इच्छा आहे!

मुक्ता-हे बंड आणि बंडाची आरोळी, मुंजीचा संस्कार जमल्यास साधावा एवढ्यासाठीच ना?

निवृत्ती- पुन्हा तू मूळ पदावर आलीस मुक्ता!

मुक्ता- येणारच! कारण त्याचं अजून सर्व दृष्टीनं उत्तर मिळालं नाही! तुम्ही अशा या बाह्य संस्काराला एवढं महत्त्व देताच का मुळी?

निवृत्ती–- आपल्या पूर्वजांनी तसं आपलं धर्मशास्त्र केलं आहे ना! "जन्मना जायते शूद्र: संस्काराद्विज उच्यते!" हे आहे शास्त्र वचन!

मुक्ता–-हे ठीक आहे!! एकीकडे बंडाची भाषा बोलायची आणि दुसरीकडे धर्मशास्त्राचं स्तोम वाजवायचं!

निवृत्ती –- बंड आणि धर्मशास्त्र हे एकत्र येऊच शकणार नाहीत अशी तुझी कल्पना दिसते! अग,आमचं बंड काही धर्मशास्त्राविरुद्ध नाही.संस्कार हा त्याज्य आहे असं थोडंच मी म्हणतो? उलट आमच्यासारख्या निरपराध मुलांना ते संस्कार नाकारले जात आहेत ; त्या नकाराविरुद्ध हे बंड आहे!

मुक्ता –- पण हे बंड पुकारूनही शुद्धिपत्र मिळणार नाही, असंच अधिक वाटतं! म्हणजे ज्या संस्कारासाठी एवढा आटापिटा करायचा तो अखेर नाहीच; मग या बंडाची फलश्रुती काय?

निवृत्ती –-फलश्रुती फार मोठी आहे मुक्ता. इष्ट स्थळी जरी पाण्यात टाकलेला दगड पडला नाही तरी पाण्यात तरंग उठून सर्व जीवन ढवळून निघेल, हे काय कमीआहे? कालांतरानं गाळ खाली बसून पाणी शुद्ध होईल ; पण पाण्यात काहीच हालचाल झाली नाही तर ते सडून कुजट दुर्गंधी सुटेल! आम्हाला शुद्धिपत्र मिळालं की, आम्ही सशास्त्र मुलं आहोत हे सिद्ध होईल आणि आमचा विजयच होईल! तेवढ्यामुळे सामाजिक रूढी व सामाजिक बंधने बरीच लवचिक व सैल होतील.आणि शुद्धिपत्र मिळालं नाही तरीही आमचाच कार्यभाग होईल! त्यामुळे सामाजिक बंधने किती ताठर व न बदलणारी म्हणजेच जाचक झाली आहेत हे सर्व समाजाला कळून येईल!

ज्ञानेश्वर--आता तुम्ही केलेलं या विषयाचं प्रतिपादन अगदी निराळ्या दिठींतून आहे! -सामाजिक फलश्रुतीच्या दिठींतून आहे! :आतापर्यंत आमच्या व्रतबंधाच्या अनुरोधान विचार आम्ही केला; आणि त्याचअनुरोधान पाहिलं - कारण तो एक महत्त्वाचा विचारआहे- तर मौजी बंधनाच्या संस्काराचं प्रमुख उद्दिष्ट जे गुरुपदेश आणि ज्ञानसंपादन ते आम्हाला यापूर्वीच प्राप्त झालेलं आहे.

निवृत्ती-- ते कसं काय?

ज्ञानेश्वर-- आम्हाला समाजात स्थान द्यावयाला,आमची मुंज करायला ब्राह्मण तयार नव्हते ; परंतु त्यावेळी तुम्हाला सर्व विख्यात आणि सर्वमान्य गहिनीनाथांनीआपल्या पंथात समाविष्ट करून घेतलं ; तुम्हावर अनुग्रह केला आणि योग मार्गात निष्णात केलं. आज तुम्ही आम्हा तिघा भावंडांचे सद्गुरू आहात.अशा रीतीने आम्हाला शास्त्राध्ययन करायला मार्ग मोकळा झाला आहे.

निवृत्ती-- हे खरं आहे.

ज्ञानेश्वर-- तेव्हा आता आमची शास्त्रोक्त मुंज झाली नाही म्हणून कुठे अडणार आहे,? मला स्वतःला तुम्हा कडून यथाविधी गुरुपदेश मिळाला

a

आणि गुरु सन्निध जाणं हा व्रतबंधाचा हेतू असल्यामुळं लौकिक नसली तरी माझी परमार्थिक मुंज झाली आहे

निवृत्ती–-हे सारं मला मान्य ; परंतु हे केवळ आमचं मानसिक समाधान झालं. मग मघाशी विवरिलेल्या सामाजिक दिठींचाही विचार अगत्याचा आहे.आम्हाला या समाजासाठी, या समाजात काही कार्य करायचं आहे. तुझ्याही दृष्टीला या समाजात जे अज्ञान, जी अविद्या दिसते ती फेडून स्वधर्म सूर्य उगवलेला पहावयाचा आहे. तेव्हा आमचं कार्य जगन्मान्य व्हायला या जगाला अगोदर आम्हाला मान्य करायला नको का? तेव्हा, आता सांग, केवळ स्वतःच्याच मानसिक समाधानात गुंग राहून कसं चालेल?

मुक्ता- का नाही चालणार?आपण आपल्या कार्यशक्तीन कार्य करीत राहिलं म्हणजे झालं.आपल्या मागे समाज येईलच!

निवृत्ती–-असं नव्हे मुक्ता. समाजाला असं उपेक्षून,त्याच्याशी फटकून वागून भागत नाही. आपल्याला काय आपला वेगळा पंथ चालू करायचा आहे?आपण जर केवळ आपल्या मनापुरतं पाहात राहिलो तर आपल्याला अनुकूल असा एक तोटका समाज आपल्या मागे येईल. तो एक लहानसा पंथ होईल.

मुक्ता-तरीही काही कमी नाही.तो पंथ पुढे मोठा होऊन उर्वरित काम करून टाकील.

निवृत्ती-असं प्रत्येक पंथकाराला वाटतं! पण त्याच्यामागे तोही पंथ भ्रष्ट होतो, चाकोरीबद्ध होतो, काटेकोर होतो आणि त्याचं एक दुबळं स्वरुप चिवटपणे आपला वेगळा प्रपंच करीत राहतं! अशा पंथोपपंथांनीच समाज विघटित, खिळखिळा होतो;आणि अवैद्येची काळरात्र अधिकच भयानक आणि गडद होते.

ज्ञानेश्वर–-आपल्या वाणीच्या प्रखर सूर्यापुढे माझ्या मनातलं शंकांचं धुकं पार विरघळून गेलं! या सामाजिक फलश्वतीसाठी आपणाला शुद्धिपत्राचं हे प्रकरण धसास लावलच पाहिजे,असं मलाही आता तीव्रतेने वाटतं आहे. पण मी माझ्या शंका विचारल्याआणि मुक्तानं माझा पाठपुरावा केला याचा गुरुमाऊलीला राग तर नाही ना आला?

निवृत्ती-(प्रसन्नतेने हसून) राग? उलट तू आपलं मन मोकळं केलंस आणि मुक्तानं तुला सहाय्य केलं याबद्दल मला आनंदच वाटला. ज्ञानेश्वरा, तुझ्या अंतकरणातली काजळी तू झाडून टाकलीस हेआमच्या कार्याच्या दृष्टीनं प्रसादचिन्हच!तुझं हे दैदीप्यमान अंतकरण आता काय करणार नाही?

ज्ञानेश्वर-माझ्या अंतकरणात आता खरोखरच प्रचंड स्फुरण चालू आहे!आजचा दिवस हा आता माझाआहे! गुरुदेव आपण साक्षात जीवनकळा आहात.त्या जीवनकळेच अमृत प्राशून मी अभेद्य झालोआहे! आपल्या कृपेचं कवच सदोदित माझ्यावर असावं एवढीच प्रार्थना.

निवृत्ती- अहाहा! आजपासून माझ्या योगसाधनेला अमृत फळ येणार! आपण न्यायासाठी झगडत आहोत हे, ज्ञानदेवा, सर्व जगाला कळू दे! प्रसंग पडला तर अवघ्या जगाशी आपण टक्कर देऊ; आणि आपल्या वडिलांनी तोंड फोडलेला हा वाद शेवटास लावू! तू या कार्यासाठी कंबर कसावीस हीच माझ्या जीवाची लागणी होती. शास्त्री-पंडितांबरोबर दोन हात करण्यास आमच्यामध्ये तूच अधिक समर्थ आहेस! त्या कार्यासाठी तुझी सिद्धता झालेली पाहून माझे अष्टौभाव प्रगट होऊ पाहातआहेत!

ज्ञानदेव-माझ्या अंतकरणाचं सामर्थ्य हे आपलं सामर्थ्यआहे! आणि यापुढं अधिक सामर्थ्य देणं, हे ही आपल्याच हाती आहे. आपणच माझ्या ठायी विवेकवल्लीची लावणी केलीत. आपणआता माझ्या अंतकरणात उचित शब्दांच्या खाणी उघडा.

संवादफळ निधाने | प्रमेयांची उद्याने | लावी म्हणे गहने | निरंतर ||

पाखांडाचे दरकुटे | मोडी वाग्वादअव्हांटे |

a

कुतर्काची दुष्टे| सावजे फेडी ||

खरोखर माझ्या स्वतःच्या शक्तीबाहेरची गोष्ट करण्याला मी सरसावत आहे.पण आपल्या एका आधारावरच मी सदर बोलण्याचं ठरवीत आहे.

निवृत्ती-ज्ञानदेव,तुझ्याकडे न्युनत्व घेण्याचं काही एक कारण नाही. आता आपलं मन आपल्या कार्यावर एकाग्र कर आणि भगवान कृष्णाच्या ठाई वृत्ती विलीन कर. भगवान श्रीकृष्ण तुला सर्वत्र सरते करोत ही माझीही प्रार्थना.चला. आपण आता निघण्याच्या तयारीला लागू.

ज्ञानेश्वर-निघण्याची तयारी म्हणजे विशेष काही नाही मुक्ता! ऊन थालीपीठ करून या हातावर टाक मग तुझं काम झालं! तू पाणी आणून ठेवलंच आहेस! ते गार, अमृततुल्य पाणी आम्ही पिऊ आणि ढेकर देत मार्गाला लागू!

मुक्ता¯-हात्तीच्या!एवढेच ना! मला वाटलं, तू बासुंदी पुरीची मागणी करतोस!(सर्व जण हसतात)

पडदा

अंक पहिला समाप्त

# अंक २

—

## प्रवेश एक

(स्थळ:- पैठण. श्री गणपतीच्या देवळाकडे जाणारी पायवाट. वेळ:- सकाळचे सात वाजले आहेत.

पायवाटेवरून काळू लोहार आणि नागदेव बोलत बोलत येत आहेत.काळू लोहाराच्या डोकीवर पखाल, अर्थात आहेच!)

काळू –-अर् र् ,अरारारा ,चुकलं, सम्दच चुकलं!

नागदेव –-का रं? आनी काय झालं?

काळू⁻-देवळांतली हवा आज लई तापनार म्हनलास न्हवं?

नाग-व्हय्! लई मोठा वाद व्हायचाय तथं!

काळू –-मग बामनांची डोस्कीबी तापत्याल की! ती तुळतुळीत, गोटा केल्याली डोस्की!

नाग- हा,चांगलीच गरम हुत्याल!

काळू- हा! हतच चुकलं म्हटलं म्या!

नाग-ते कसं काय बा?

काळू-तापल्याली डोस्की थंड कराया तथ पानी असल न्हव? पान्यात बुडावली की तापल्यालं लोखंड गार झाल्यागत थंडगार हुतील.

नाग- काय लागायचं न्हाई पानी. चल तू गुमान!

काळू- हँ! असं कुटं झालंया? इतळून जात्याल की तापून तापून! मदनं मदनं पानी शिंपडल्यालं चांगलं!

नाग-अन् बामनांची डोस्की इतळून गेली म्हनून कुटं बिघडतं! चल हो म्होरं!

काळू- छा! आपुन न्हाई बा!भट्टीत लोकांड इतळाया लागलं म्हनजे कसा माझा पराण गेल्यागत होतोय मर्दा आन् म्हनं डोस्की इतळली म्हणून काय बिघाडतं? बघवत न्हाई मला! कारागिराचं डोळं हायेत ह्ये!

a

नाग- आता काय म्हणावं तुझ्या एकेक खुळाला! आरं तुज डोस्कं कवा तापत न्हाई
व्हय?

काळू - तापतं तर!

नाग- मग थंड कशानं करतुस? पाणी शिंपडून? की पाण्यात बुडवून?

काळू -(लाजत)आरं पर माझी बाइल असते. ती म्होरं आली की पार एकदम थंड!
(हसतो) पानी शिंपडायचा वकूतच येत न्हाई! आज सकाळचंच बघितलंस न्हवं?

नाग- (हसतो) खरं हाय! मग काय म्हनतोस?

काळू-तथ काय बामणांच्या बायका न्हाई येनार! तवा त्यांची डोस्की कशी थंड व्हत्याल? माझी पखाल तर रिकामी हाय! पान्याचा टिपुस् बी न्हाई!

नाग-मग काय करनार तू?

काळू–-आदुगर जाऊन पानी आनतो! लईच डोस्की तापली तर अख्खी पखाल पालथी घालीन तेंच्यावर!

नाग-काळ्या, आता मातूर तू खराच रेडा दिसतुस मला! लेका, तुला डोस्कच न्हाई!

काळू –- डोस्कं न्हाई? (रागानं)आनं मग ही पखाल कशावर पेललीया रं? आं?

नाग- पखाली बुडी जे हाय त्यो दगुड हाय! टक्कूरं न्हाई!

काळू-काय म्हनतोस ते तुजं तुलाच ठावं! मातुर जास्त बडबड करू नगस आता! सांगून ठेवतो! (समोर दूरवर पाहून) अबाबाबा! काय गर्दी हाय ही! या समद्यांचीच डोस्की तापली तर माजी पखालबी पुरायची न्हाय! जा तू. हो म्होरं मी पानी घेऊनशान येतोच!

नाग-अरं मी सांगतो ते वाईच ऐकून घे! काय लागायचं न्हाई तुजं पानी! तू आपला गुमान चल देवळाकडं!

काळू–- नाही! मी शाप सांगतो, पान्याबिगार न्हाई! मग तू काय बी म्हन मला!

a

नाग-मी काय म्हननार तुला? काही म्हनीन तर हतंच मला पानी पाजशील! त्यापक्षी मी आपला म्होरं हुतो!

काळू- हो. हो म्होरं! अजून येळ बी दिसतुय वादाला.मी तवर पानी घेऊनशान येतोच!

नाग-(च्,च्, च् करीत) पन पानी न्हाई लागायचं!

काळू - न्हाय लागलं तर बरं हुईल! तकडं कारभारनी पान्याची वाट बगतीच हाय! हतं पानी आनुनशांन ठेवलं, आन् ते न्हाई लागलं तर हतनंच थेट घराकडे जाऊ! उगाच वकुतबी फुकाट न्हाय जाणार!

नाग-ठीक हाय! मी हकडंच वरल्या अंगाला उभा हाय, बरं का? ये तू!

काळू -हां. हां. हा. हा.आत्ता येतोच! (जातात.)

–

# प्रवेश २

—-

(गणपतीचे देवालय. देवळात अलोट गर्दी जमलेली आहे. न्यायनिवाडा करण्यासाठी पैठणमधील ब्रह्मवृंद जमला आहे. त्यामध्ये मुख्य नारायणभट्ट. हा अत्यंत कर्मठ ब्राह्मण आहे; आक्रस्ताळेपणा करणारा, दुराग्रही व राणा भीमदेव थाटाचा आहे. दुसरा वासुदेवशास्त्री.हा खरा विद्वान, सहृदय व रसिक आहे.विद्वान असूनही विद्वत्तेची घमेंड नाही,मोठेपणाची हाव नाही.ज्ञानाचा खरा उपासक ; परंतु त्या ठिकाणी तो एकांडा शिलेदार! बाकी भिकंबट्ट ऋग्वेदी, त्र्यंबकशास्त्री यजुर्वेदी, गणेशशास्त्री, शंकरभट्ट इत्यादी आणखी काही लहान मोठ्या अधिकाराची ब्राह्मण मंडळी आहेत. ज्ञानेश्वर, निवृत्ती,सोपान व मुक्ताबाई ही मंडळी एका बाजूस उभी आहेत.ब्रह्मवृंदाच्या बाजूला नारायण भट्ट उभा आहे.तो ब्रह्मवृंदाचा निकाल आपल्या मुखाने सांगण्यासाठी उभा आहे. अर्थात यापूर्वीच ज्ञानदेवांनी आपली कैफियत मांडलेली आहे, हे सांगणे न लगे!)

नारायण-उपस्थित ब्रह्मवृंद,विद्वान मंडळी, आणि इतर पैठणवासी जनहो,आता आपणा सर्वांना आणि विशेषतः निवाडा ऐकण्यासाठी अत्यंतोत्सुक झालेल्या निवृत्ती,ज्ञानदेवादी भावंडांना, अखिल ब्रह्मवृंदाचा एकमुखी निर्णय ऐकविण्यासाठी हा नारायणभट्ट आपणांसमोर उभा आहे. न्यायसमितीचा निर्णय आपल्या अपेक्षेप्रमाणेच आहे.

a

न्यायासनाने खूप विचार केला, शास्त्राधार धुंडाळले,परंतु कुठेच शास्त्राधार न आढळल्यामुळे न्यायदेवतेला या विठ्ठलपंतांच्या मुलांना शुद्धिपत्र नाकारावे लागले आहे. आळंदीच्या ब्रह्मवृंदानं घेतलेला निर्णय हा आम्हा पैठणच्या ब्रह्मवृंदालाही योग्यच वाटतो.करिता त्यात काही फेरफार केलेला नाही.(सर्व सभाजनात किंचित कुजबूज.) शांत रहा. तुम्ही न्यायदेवतेसमोर उभे आहां! इथले कार्य गांभीर्यानेच पार पाडले पाहिजे!(ज्ञानदेवास उद्देशुन) मुला, न्यायासनाला हा निर्णय देताना अत्यंत खेद झाला आहे ; न्यायासनाने सर्व सहानुभूती तुमच्याच पक्षाला ठेवून विचार केला. तथापि हे न्यायासन शास्त्राधारापुढे केवळ अगतिक आहे! म्हणून असा निर्णय मतैक्याने द्यावा लागला.मला वाटतं आता ब्रह्मवृंदानं उठावयाला हरकत नाही.

निवृत्ती-माझ्या मते ब्रह्मवृंदान अजून विचार करायला हवा. आमचा दावा मांडताना ज्ञानदेवानं आमच्या प्रकरणाचा विचार अधिक सहानुभूतीनं आणि विशाल दृष्टिकोनानं केला पाहिजे असं सुचविलं होतं. आणि वासुदेवशास्त्र्यांसारख्या थोर विद्वानांनी तसं करण्याचं मान्य केलंच होतं. तेव्हा प्रस्तुत स्थळी त्यांना काहीतरी सांगायचं असलंच पाहिजे.

वासुदेव-पंचायतनाचा निर्णय ऐकावयाला बसल्यानंतर निवृत्तीदेवा, वैयक्तिक मतांना किंमत नसते! निर्णय ठरविला जाईपर्यंत वैयक्तिक मतांतराला अवसर असतो ; आणि ज्या क्षणी पंचायतन बहुमताने निर्णय घेते त्याक्षणी वैयक्तिक मत पंचायतनाच्या मतात विरघळून जातात. तेव्हा आता याक्षणी काही वेगळं सांगायचं उरलेलं नाही.

ज्ञानदेव-पण शास्त्रामध्ये आधार नाही हे आम्हाला या पंचायतनासमोर येण्यापूर्वीही ठाऊक होतं. माणुसकीच्या ओलाव्याने या आमच्या असामान्य, अपूर्ण प्रश्नाकडे पाहिलं जावं अशी आमची प्रार्थना होती. पण इथं तर केवळ शास्त्राच्या आधारावरच पुन्हा न्यायदानाचं उदक सोडलं जात आहे, त्याचं काय?

नारायण-ज्ञानदेवा, तुम्हाला 'सशास्त्र मुले' असा ताम्रपट हवा असताना शास्त्रांना डावलून कसं चालेल? निमित्तमात्र का होईना पण शास्त्रांचा आधार घेतल्याविना 'सशास्त्र ' हा शब्द घेण्याचा प्रत्यक्ष ब्रह्मदेवालाही अधिकार नाही. जिथे दुबळे सुतहि सापडत नाही तिथं शास्त्राच्या स्वर्गावर चढण्यासाठी माणुसकीची शिडी कशी काय लावशील ते तूच सांग!

निवृत्ती–-एकदा माणुसकीची कांस धरायची म्हटल्यावर पुन्हा शास्त्रातील आधाराची प्रतिष्ठा आडवी येऊ नये! तुमचा निर्णय हा शास्त्रांना

a

धरून आहे, परंतु माणुसकीला सोडून आहे. माणुसकीच्या प्रदेशात मुक्त प्रवेश करायचा म्हणजे शास्त्राची चौकट ओलांडलीच पाहिजे!

नारायण- कोणत्याही शास्त्रबाह्य कृत्याला शास्त्रांची चौकट ओलांडण्याचीच भाषा नेहमी सुचते! चूक कबूल करून आजन्म देहदंड सोसण्याची बुद्धि अशास्त्रीय कृत्याला आपोआप सुचवू लागली तर ते एक नवलच वर्तेल! 'अहो आश्चर्यम् '! म्हणूनच जग त्याकडे पाहिल! तेव्हा तुम्ही माणुसकीच्या नावाचा केवळ जप करीत शास्त्राकडे दुर्लक्ष करण्यासाठी आम्हाला आवाहन करताहात हे अपराध्याला साजेसेच आहे! पण लक्षात घ्या की, तुमच्यासारख्या निरर्गल अधर्म्यांच्या सोयी करण्यासाठी ऋषीमुनींनी शास्त्रे लिहिलेली नाहीत! अपराध्यांना पायबंध घातला जावा, समाजाचा तोल सुटू नये म्हणून शास्त्रांचा जन्म! समाजाचा ताल साधला तरच समाज प्रगत होतो, आणि समाजाचा ताल म्हणजेच शास्त्र! त्या तालाच उल्लंघन करण्याचं पातक कोण सुज्ञ करील?

ज्ञानदेव-शास्त्राचं प्रयोजन काय हे न समजण्याइतपत आम्ही अज्ञ नाही, हे मला इथं निरुपायान सांगावं लागत आहे. आम्ही लहानानी मोठ्यापुढं असं बोलणं म्हणजे उद्धटपणा वाटून तुम्हाला त्याचा राग येईल! तसा तुमचा अनादर करण्याचा हेतू नाही! अनादर वाटल्यास, क्षमा असावी! पण मला असं विचारायचं आहे की ऋषीमुनींनी शास्त्रं

a

लिहिली तेव्हा आमच्यासारखा प्रश्न त्यांच्यासमोर होता का? नाहीतर समाजाचा ताल राखण्यासाठी एका असामान्य परिस्थितीत संन्याशांनं जो संसार केला त्याचा विचारही ते अवश्य करते! असामान्य परिस्थिती कोणती होती ती लक्षात घ्या. लग्न करण्यापूर्वीही आमच्या वडिलांची वृत्ती विरक्तच होती. संसाराची आवड नाही व परमार्थाची गोडी म्हणून तीर्थयात्रेला- देवाच्या शोधाला- बाहेर पडलेल्या आमच्या वडिलांचे मध्येच केवळ योगायोगाने लग्न झाले! त्यांनी लग्नानंतर काही काळ जो संसार केला तोहि मनापासून नव्हे! पुढे त्यांच्या विरक्त मनानं त्यांना श्रीपादयतींच्या चरणाप्रत ओढून नेलं. तिथं, आपलं लग्न झालेलं नाही असं खोटं सांगून, त्यांनी श्रीपादयतींच्याकडून सन्यासदीक्षा घेतली. केवळ योगायोग म्हणून पुढे, पिंपळाला आपल्या सौभाग्यालंकाराकरिता नेमाने प्रदक्षिणा घालणाऱ्या आमच्या आईला तीर्थयात्रेसाठी बाहेर पडलेले श्रीपादयति भेटले; त्यांना आईने नमस्कार केला; यतींनी "अष्टपुत्रा सौभाग्यवती भव "असा आशीर्वाद दिला! आई अधिक दुःखी झाली. श्रीपादयतींना सर्व हकीकत कळली; आणि मग आपल्या तरुण पत्नीच्या संसाराचा खेळखंडोबा करून स्वतःचा परमार्थ साधनाची कल्पना त्यांना पसंत न पडून आमच्या वडिलांना त्यांनी परत पत्नीकडे जाण्याची आज्ञा केली! वडिलांचाही निरूपाय झाला. गुरूची आज्ञा मानली पाहिजे असेही शास्त्रवचन आहे. त्या आज्ञेला मान देण्यासाठी त्यांनी पुन्हा

a

संसारात पदार्पण केलं; आणि अशा असामान्य परिस्थितीत आमचा जन्म झाला! वडिलांना संसार करण्याची आज्ञा करण्यात आपण शास्त्रांना बाजूस सारीत आहोत हे श्रीपादितींना समजत नव्हते, असं तुम्ही म्हणाल काय? मनुष्याच्या परस्पर कल्याणाला आडवे येणारे शास्त्र श्रीपादयतीनी बाजूस सारले, ही त्यांनी चूक केली असं तुम्ही म्हणाल काय?

नारायण-मग तसं म्हणायला आम्ही घाबरू की काय? शास्त्रप्रामाण्य आमच्या बाजूचं असेपर्यंत प्रत्यक्ष परमेश्वरानं जरी शास्त्रांना बाजूस सारलं तरी त्याला सुद्धा आम्ही दोषी ठरवू!

भिकंभट्ट- पण मी भिकंभट्ट म्हणतो, गुरुची आज्ञा पाळण्याच्या शास्त्र वचनाचा आधार घेऊन यांच्या बापाला मोकळं सोडण्यात आणि उलट त्या गुरूलाच फाशी देण्यात काय अर्थ आहे? शास्त्रवचनाच्या आधारावरच जर यांचा बाप मोकळा सुटत असेल तर शास्त्राधारावरच आमचा पंचायतनाचा निर्णय यांनी मान्य केला पाहिजे! पाचामुखी परमेश्वर असं शास्त्रवचनच आहे ना! मग हा प्रत्यक्ष परमेश्वराचा निर्णय माना! का पाचामुखी परमेश्वर हेही तुम्हाला मान्य नाही?

ज्ञानेश्वर-पाचामुखी परमेश्वर काय ; पण प्रत्येकाच्या मुखी परमेश्वर आहे,अशी माझी प्रतीती आहे!

नारायण-मग तर सारा प्रश्नच आटोपला!

ज्ञानेश्वर-नाही! प्रश्न उलगडला गेला म्हणा. आमच्या मातापित्यांनी जे केलं ते परमेश्वरानेच केलं असं समजलं पाहिजे!कारण प्रत्येकात परमेश्वराचं अधिष्ठान आहे. आणि त्या दृष्टीने परमेश्वर पाप करतो असं म्हणणं वदतोव्याघात ठरेल!

गणेश-मग या पृथ्वीतलावर कुणीसुद्धा अनितीमान, पापी, नाहीच म्हणायचे! वा ऽ रे वा तत्त्वज्ञान!! चोरानं चोरी केली तरी आता त्याला चोर म्हणायला नको! कारण तुमच्या आई-वडिलांनी धडधडीत,राजरोसपणे पाप केलं;
परंतु आपल्या युक्तिवादानं ते पुण्य ठरविलंस ना तू!!

ज्ञानेश्वर-चोराची चोरी आणि आमच्या वडिलांचा संन्यासोत्तर संसार या दोन्ही गोष्टी एक नव्हेत! पण तसं म्हणणाऱ्याचं तोंड कोण विधाता आवरू शकेल?

शंकरभट्ट-नाही नाही! फार मोठं पुण्य कर्म केलं आहे तुमच्या वडिलांनी! ऐकलंत नारायण शास्त्री!

ज्ञानदेव- मी म्हणालो ना, बोलणाऱ्याच तोंड कोण आवरणार म्हणून! पण, वादाकरिता, घटकाभर समजू की आमच्या वडिलांनी पाप कर्म केलं म्हणून!आता त्या पापाचं प्रायश्चित नदीत आत्मार्पण करून त्यांनी घेतलंच आहे. त्यांचं पाप नदीने धुऊन टाकलं असताना पुन्हा त्यांचं पाप आम्हा मुलांच्या माथी का?

नारायण-काय प्रश्न आहे! म्हणे आम्हा मुलांच्या माथी पाप का? त्या पापकर्माची तर तुम्ही चालती बोलती फळ आहात!

ज्ञानदेव-पण आमच्या वडिलांनी पाप केलं आहे हे आम्ही केवळ वादा करिता घटकाभर गृहीत धरलं आहे, हे विसरू नका. नारायणभट्ट.

त्र्यंबक-तुम्ही घटकावर गृहीत धरता ;पण आम्हाला ते पापीच वाटतात! तुमचे आईवडील म्हणून ते तुम्हाला परमेश्वरस्वरूप वाटत असल्यास वाद नाही! पण आमच्या दृष्टीनं ते शुद्ध पापांच्या राशी आहेत! आपल्या कुडबुड्या तत्त्वज्ञानानं त्यांचा परमेश्वरी बडेजाव आमच्या गळी उतरविण्याचा व्यर्थ प्रयत्न करू नकोस! का हो नारायणभट्ट?

a

नारायण-हो! आम्हाला शिकविण्याचा आव आणू नकोस! परमेश्वर कोण हे काय आम्हाला ठाऊक नाही? परमेश्वर असते तुझे आई-वडील तर ते दुबळेपणानं नदीत कशाला जीव देते? परमेश्वर - सर्वशक्तिमान परमेश्वर दुबळा होण्यासाठी तुमच्या आईवडिलांच्या स्वरूपात अवतरला असेल नाही? मोठा आला आहे आजोबाला शिकवायला नातू!अजून ओठावरचं दूधसुद्धा न सुकलेली पोरं तुम्ही ; तुम्हाला रे काय कळतो परमेश्वर?

ज्ञानदेव-तुमच्या आताच्या बोलण्यावरून परमेश्वराच्या स्वरूपासंबंधी तुम्ही शुद्ध अज्ञानी आहात असं म्हणावं लागेल!

नारायण-(चिडून) काय म्हणालास? मी शुद्ध अज्ञानी? पाजळ पाहू तुझं तरी परमेश्वर विषयक ज्ञान!

ज्ञानेश्वर-परमेश्वर एक आहे आणि तोच या सृष्टीत भरून आहे, हे पटतं तुम्हाला? या विश्वात जी रूपे,जी नावे दिसताहेत ती त्याचीच अनंत रूपे आणि अनंत नावे आहेत, हे पटतं तुम्हाला? किंबहुना ही रूपे, ही नावे हे सारं आभास असून ही रूपे,ही नावे म्हणजेही तोच आहे- तो एकच एक. सगळं आहे, हे पटतं तुम्हाला?

a

नारायण-तू वेदांत बोलतो आहेस हे कळतं आम्हाला ; पण पटत मात्र नाही. तुझी उडी वेदांच्याही पलीकडे दिसते! वेद सांगतात की, हे विश्व परमेश्वरानं निर्मिलेलं आहे ; पण हे विश्व म्हणजे परमेश्वर नव्हे ; - हे विश्व म्हणजे माया आहे ;आणि तू मात्र हे विश्व म्हणजेच परमेश्वर म्हणून सांगण्याचा आव आणतो आहेस! प्रत्यक्ष जगद्गुरु शंकराचार्यांनी जिथे मायावाद सांगितला त्यांच्यापुढे तू पोरटे काय दिवे जाणार आहेस? सूर्यापुढे पणती पेटविण्यासारखंच आहे हे!

ज्ञानेश्वर-ठीक आहे! पण याचाच अर्थ तुम्हाला परमेश्वर समजलेला नाही असं मी समजतो. तुम्हाला आत्मप्रतितीच नाही. आणि ती होणार तरी कशी?

नारायण-आहा रे आत्मप्रतीतीच्या गड्या! ऐका शास्त्री मंडळी! ऐकलंत वासुदेवशास्त्री! (ज्ञानदेवास) एक देव तू समजतोस तो आहे तरी कोणता? या सर्व सिद्धी प्राप्त करून देणाऱ्या श्री विनायकाला तू देव समजतोस की नाही?

ज्ञानेश्वर- अर्थात समजतो.

नारायण- त्या दुर्गा देवीला तू देवी समजतोस?

ज्ञानेश्वर –- अर्थात.

नारायण –-. या नागाला तू देव समजतोस?

ज्ञानेश्वर –- अर्थात.

नारायण –-अर्थात तुझ्या देवाच्या प्रतीतीमध्ये आणि आमच्या देवाच्या समजूतीमध्ये काहीच फरक नाही!

ज्ञानेश्वर-अर्थात आहे! तुम्ही केवळ त्या मूर्तीमध्ये देव आहे - किंबहुना ती मूर्ती म्हणजेच देव. तिच्यापलीकडे देव नाही असे समजता ; मी तसं समजत नाही! 'मी' स्वतः ते परब्रम्ह नाही असं तुम्ही समजता! मी ते परब्रह्म आहे असं मानतो ; अनुभवितो! तुमच्या त्या समजूतिलाच मी अज्ञान म्हणतो! या अज्ञानामुळेच तुम्ही माझ्या मातापित्यांना परमेश्वर मानू शकत नाही! या अज्ञानामुळेच तुम्ही आणि तुमच्यापेक्षा हलक्या बुद्धीच्या ब्राह्मणांनी या समाजामध्ये नाना खुळं माजविलेली आहेत! समाजाच्या गुरुस्थानी तुम्हा ब्राह्मणांना धर्मानं नेमलं ; पण आपल्या समाजरूपी शिष्याला शहाणं करण्यापेक्षा त्याला अज्ञानी कसा बनविता येईल याकडे- काही क्षणिक व क्षुल्लक स्वार्थ लोभाकरिता - तुम्ही विशेष लक्ष दिलं आहे!

नारायण- आता मात्र हा वाहवत चालला बरं!

ज्ञानदेव-वाहवलो नाही.सत्य ते बोललो. तुम्हाला सत्याचीही चाड नाही काय? सत्य ऐकून तुम्हाला घाबरायला होतं काय?

नारायण –-तू सत्य ऐकविणार? ऐकव तरी पाहू तुझं सत्य! सांग पाहू आमच्यामुळे कोणतं अज्ञान पसरलं आहे समाजात?

ज्ञानेश्वर –-ऐकायचा आहे तुमच्या कार्याचा पाढा? ऐका तर! सर्वसामान्य जनाना तुमची संस्कृत भाषा येत नाही ; आणि तुम्हाला ती भाषा अवगत असून तुम्ही त्या भाषेमध्ये सांगितलेले आत्म्याचा उद्धार करणारे ज्ञान स्वतः समजावून घेतलेले नाही. क्वचित ज्ञान अवगत करून घेतलेले असले तरी तुम्ही ते समाजातील अज्ञ जनांना समजावून सांगत नाही. त्यामुळे समाजात कोणती खुळ माजलेली आहेत - किंबहुना तुम्ही स्वतःच्या उदरभरणार्थ माजविलेली आहेत ती पहा : समाजातील कुणबट आणि कुळवाडी आन आन देव मांडतात आणि आदि पुरुषाची सेवा केल्याचेच समाधान मानतात ; परंतु भजन पूजन करूनही तो देव पावला नाही म्हणजे आघवे टवाळ आहे, हे सांडा, असं म्हणता. त्यांचं भजन एकनिष्ठेने ज्याप्रमाणे चालत नाही त्याचप्रमाणे दगडांच्या वगैरे मूर्तीवर सर्वस्वी भर देणारे

a

हे लोक प्राणिजातेसी अत्यंत निष्ठुर होतात! पहा, पहा काय दुर्दशा केली आहे तुम्ही या लोकांची!

गणेश –- आम्ही ही दुर्दशा केली काय?

ज्ञानेश्वर –-हो,हो! तुम्ही केली आहे! पण तुम्ही तरी त्याहून वेगळे काय करणार! तुमची- सुद्धा तीच परवड आहे! तुमची तरी कथा काय आहे एकेक! वा, वा,वा! देव समजायचा एक ; पण तो केवळ समजण्यापुरताच! कार्यापुरती भजता कुलदेवता ; आणि पर्वविशेषी पुजिता दुसरीच देवता! तिसरीच देवता नवसाकरिता, आणि पितृकाऱ्यावसरी पितरांचीच प्रतिष्ठा! एकादशीच्या दिवशी, जेतुला पाड देवासी, तेतुलाचि नागासी, पंचमीच्या दिवशी! चौथ मोकटी पाहे, आणि गणेशाचाचि होये! चऊदसी म्हणे माये, तुझाचि वो दुर्गे! तुमची जी नित्यनैमित्तिक कर्मे असतात तीसुद्धा सांडता आणि नवरात्रात चंडीपाठादि करावयास खुशाल बसता! आदित्यवार आला रे आला की भैरोबाला पात्री वाढता :पाठी सोमवार पावे, आणि बेलेंसी लिंगा धावे ऐसा तुम्हापैकी एकेकटाच आघव्या देवांचा समाचार घेतो! जणू काही सर्व प्रकारानं गावद्वारी बसलेली अखंड सौभाग्यवतीच! एकदा या देवाचं भजन करता! एकदा त्या देवाचे भजन करता! अशा प्रकारे सैरावैरा धावणारे तुम्ही लोक अज्ञानाचे मूर्त अवतार आहात!

a

शंकरभट्ट –- अरे वा! बरंच कवित्व पाजळायला लागलास की तू!

ज्ञानेश्वर-फार गोड लागलेलं दिसतं तुम्हाला हे कवित्व! ऐका तर अजून ऐका! - तुमच्यामध्ये असे काही महाभाग आहेत की, चोखटे एकांते किंवा तपोवने,तटे अथवा तीर्थे देखतात आणि वैराग्याची लाट त्यांच्या हृदयात उसळते! तेहि अज्ञानाचे मूर्त अवतार आहेत! काहींना जनपदी सुख वाटतं,लौकिकाची स्तुती करावीशी वाटते, गर्दीचं, गजबजेचं वेड असतं! ते सुद्धा तेच! तुमच्यात असे काही विद्वांसू आहेत की आत्म्याची ओळख पटविणारी जी विद्या आहे तिचं नाव कानी पडताच, गोंधळयाच्या वाद्याप्रमाणे बडबड करून ते तिची थट्टा करितात; उपनिषदाकडे त्या विद्वान म्हणणाऱ्यांची नेहमी पाठ फिरलेली असते ; त्यांना योगशास्त्र रुचत नाही ; तथापि ते कर्मकांड उत्तम जाणतात. पुराणे त्यांना मुखोद्गत असतात- एवढेच काय भविष्य-पुराणांमध्ये जसं जसं लिहिलेलं आहे, तसंच हे सगळं होतं,असा ढोल ते वाजवितात! नीतिशास्त्र त्यांनी कोळून प्यालेलं असते, वैद्यकशास्त्र त्यांच्या जिभेवर असते, काव्यनाटकात त्यांच्यासारखे तेच चतुर असतात, स्मृतींची चर्चा करण्यात ते पटाईत असतात, गारुडविद्येचं ते मर्म जाणतात, वेदातील शब्दार्थांचा कोश त्यांच्या प्रज्ञेचा पाईकी करतो, व्याकरणात पारंगत, तर्कशास्त्रात अति गाढे, परंतु नसते एक- आत्मज्ञान! त्यामुळे ते जात्यंध होत! आत्मज्ञानावाचून आघव्या शास्त्रात जणू काय सिद्धांत निर्माण

a

करणारीच त्यांची विद्वत्ता असते! पण त्याचा काय उपयोग? मोराच्या सर्व अंगभर डोळे असलेली पिसे असावीत ; परंतु त्याला एक तेव्हढी दृष्टी मात्र असू नये, तशी त्यांची अवस्था असते! या मोराअंगीच्या सहस्रो डोळयांची जी किंमत तीच त्या विद्वांसूच्या विद्वत्तेची किंमत! अध्यात्मज्ञानाच्या ठाई नित्य बोध नसलेले, ते शास्त्रमूढ होत! तया शरीर जे जाले, ते अज्ञानाचे बी वीरूढले, तयांचे व्युत्पन्नत्व गेले, अज्ञानवेली! तो जे जे बोले, ते अज्ञानचि फुलले, तयाचे पुण्य जे फळले, ते अज्ञान गा! आणि अध्यात्मज्ञान काही,जेणे मानिलेचि नाही, तो ज्ञानार्थ न देखे काई,हे बोलोवे असे!

नारायण –-वा! तुझी बाजू तर तू मोठी नामी सजविलीस मुला! पण त्यामुळेच तू जगाच्या दृष्टीने स्वतःला हस्यास्पद करून घेत आहेस! जगातील सर्व ज्ञानाला निखंदून बोलून केवळ स्वतःला प्रिय असलेल्या अध्यात्म ज्ञानाचा बडेजाव सांगणं हेही एक अज्ञानच आहे!

ज्ञानेश्वर –-तुम्ही ज्या ज्ञानाची चवीच अनुभवलेली नाही त्या ज्ञानाची किंमत तुम्हाला कशी आकळणार? ज्ञानातला ज्ञानराज कळावयाला स्वतःची योग्यताही वाढवावी लागते!

नारायण –-आत्मज्ञानाचा आपण मूर्तिमंत पुतळा आहोत अशी तुझी कल्पना दिसते! आपलं नाव ज्ञानराज आहे म्हणून आपण खरेच ज्ञानाचे राजे

आहोत असं तुला वाटत आहेस दिसतं! आणि म्हणून आपल्या ज्ञानाचा टेंभा मिरवित तू इथं आमच्या व्याकरणज्ञानाची, आमच्या पुराणांची, आमच्या कर्मकांडाची टर उडवीत उभा आहेस! परंतु तुझ्यासारख्या अहंमन्यानं आमच्यासारख्या मूर्त अज्ञान्यांकडे शुद्धिपत्राची भीक मागायला हात पसरावेत यातच तुझ्या ज्ञानाचा पराभव आहे! तुझ्यासारख्या स्वतःला परमेश्वर स्वरूप समजणाऱ्या विपरीत आणि अज्ञानी आत्मज्ञान्यानं मौजीबंधनाच्या संस्काराची कदर बाळगावी हेच तुला काळान दिलेलं उत्तर आहे! काळानच तुझ्या आत्मज्ञानाचं फोलपण सिद्ध केलं आहे!

ज्ञानेश्वर –-नाही! आत्मज्ञानी झाला तरी त्याला देह भोग आणि देह धर्म टाकता येत नाहीत. तसेच मौजीबंधनासारखे धर्मप्रणित पवित्र संस्कारही सांडता येत नाहीत! तो 'या' जगात असतो ; तेव्हा त्याला लौकिकाला मान तुकवावी लागतेच!

नारायण- मग तुझ्यात आणि आमच्यात फरक काय?

ज्ञानेश्वर –-फरक फार मोठा आहे! तुम्ही या जगात असता आणि या जगाचेही असता ; आत्मज्ञानी पुरुष या जगात असतो. पण या जगाचा नसतो! तो या जगात असतो म्हणून त्याला या जगाप्रमाणे वागाव लागतं इतकच! जो अंतरी दृढ, परमात्मारुपी गूढ,बाह्य तरी रूढ, लौकिक

a

जैसा! तो इंद्रिया आज्ञा न करी, विषयांचे भय न धरी, प्राप्त कर्म नाव्हेरी, उचित जे जे! तो कर्मेंद्रिये कर्मी राहटता तरी न नियमी ; परि तेथचेनि उर्मी, झाकोळेना! तो कामनामात्रे न घेपे, मोहमळे न लिंपे ; जैसे जळी जळे न शिंपे, पद्मपत्र! तैसा संसर्गामाजि असे, सकळासारिखा दिसे ; जैसे तोयसंगे आभासे, भानुबिंब! म्हणौनि निष्कर्म्य होआवे, तरी एथ ते न संभवे!आणि निषिद्ध केवी राहाटावे,विचारी पा?

नारायण —-विचारी पां!! तुम्हाला पटतं काहो हे, वासुदेवशास्त्री? तुम्ही मगापासून अगदी उगेच म्हणून विचारतो!

वासुदेव —- पटत नव्हतं पूर्वी ; पण आता पटत चाललं!

नारायण —-तुमच्यासारख्या विद्वानानं या पोरट्याला असं अगतिकतेने शरण जावं याचं आम्हाला सखेद आश्चर्य वाटतं!का हो भिकमभट्ट?मी म्हणतो -

भिकंभट्ट —-अगदी बरोबर आहे! शतशः बरोबर आहे!

गणेश —-मला तर वाटतं या मुलाचा बुद्धिभ्रंश होण्याची वेळ समीप येऊन ठेपली आहे! आत्मज्ञानी काय,तो या जगात असतो काय, तो या जगात नसतो काय.

a

शंकर —-पुन्हा या लौकिकाला तो सोडत नाही काय.

त्रंबक,भिकंभट्ट,गणेश,शंकर –- सारंच काय, काय, काय! आणि काय?

त्र्यंबक –-अहो आता नुसती काव काव करण्याचीच काय ती बाकी ठेवली आहे या ज्ञान्यानं!

नारायण –-नाही तरी याची आतापर्यंत आत्मज्ञानाची कावकावच चालली आहे! काय रे, तुझ्या या कावकावीतून किंवा कावाकावीतून अजून काही कर्कश आवाज निपजेलच नाही? या तुझ्या आत्मज्ञान्याला कर्मेंद्रिये कर्मी ठेवण्याचं मुळी प्रयोजनच काय?

ज्ञानेश्वर –-तुमचा हेटाळणीचा स्वर मी जाणतो! तथापि कर्मफलाची आशा न ठेवता प्राप्त कर्म करण्याचाच एक भाग म्हणून मी त्याचंही उत्तर देतो.आत्मज्ञान्यांना आपली कर्मेंद्रिये इतर सामान्य लोकांप्रमाणेच कर्मात ठेवण्याचं प्रयोजन असं की, ते स्वतः जरी प्राप्तार्ध जाहले, निष्कामता पावले, तरी तयांही कर्तव्य असे उरले, लोकांलागी! स्वतः कर्म आचरिले असता या लोकांना कर्मे कशी आचरावीत याचा आदर्श दिसेल आणि हा लोक दुःखापासून दूर राहील अशी त्यांची कल्पना असते. आणि म्हणून अंधांबरोबर डोळस देखील त्याच मार्गावरून त्यांना मार्ग दाखवावा म्हणून जसा पुढे जातो

a

तसाच अज्ञांना आत्मज्ञानी स्वतः धर्म आचरून प्रकट करीत असतात.

हा गा ऐसे जरी न की जे, तरी अज्ञाना काय उमजे?
तिही कवणेपरी जाणिजे मार्गाते या?
येथ वडिल जे जे करिती, तया नाम धर्म ठेविती ;
तेचि येर अनुष्ठिति, सामान्य सकळ!
हे ऐसे असे स्वभावे, म्हणोनि कर्म न संडावे,-
विशेषे आचरावे लागे संती!! हे भूतजात सकळ,
असे आम्हा आधीनचि केवळ,

अशी आम्हा आत्मज्ञानीयांची भावना असते! तेव्हा ते भ्रष्ट होऊ नये म्हणून

आमचे कर्मी राहाटणे! आम्ही पूर्ण काम होऊनि
जरी आत्मस्थिती राहूनी, तरी प्रजा हे कैसेनी निस्तरेल?
म्हणोनि समर्थ जो एथे,आथिला सर्वज्ञते,
तैणे विशेषे कर्माते, त्यजावे ना!
मार्गाधारे वर्तावे, विश्व हे मोहरे लावावे,
अलौकिक नोहावे, लोकांप्रती!
जे सायासे स्तन सेवी, ते पक्वाने केवी जेवी,
म्हणोनि बाळका जैसी नेदावी, पक्वाने ती ;
तैसी कर्मी जया अयोग्यता,तयांप्रति नैष्कर्म्यता
न प्रकटावी खेळता आदि करूनी!!

वासुदेव –-अहाहा! ज्ञानराजा, सोनियांच्या मर्हाटी ताटी, अमृताची बाळ -वाटी पाजिली स्नेहदृष्टी,तृप्त झालो! बोला. असेच बोलत रहा -हा अमृताचा बोल आकंठ पिऊ द्या

नारायण-(उपहासाने) बोला! नुसते बोलत सुटा! अध्यात्म ज्ञानाचे जेवण तुम्ही यथेच्छ जेवलेले दिसता; त्याची ढेकर नाही तरी अजून बाहेर पडायचीच आहे! आता या विश्वाची उत्पत्ती कशी झाली ते बरळून ढेकर द्या म्हणजे प्रलयाच्या तत्त्वज्ञानाची वामकुक्षी घ्यावयास ठीक पडेल!!

वासुदेव –- नारायणभट्ट, आता यानंतर तरी या मुलांची - या उपेक्षितांची- उपेक्षा थांबवणं शहाणपणाचं ठरेल! या लहान मुलांचा अधिकार फार मोठा आहे! ही लहान आहेत म्हणून आम्हापेक्षा शहाणी नाहीत,असं समजणं चूक ठरेल! बालादपि सुभाषितम् ग्राह्यम्! यातलं मर्म वेळीच जाणणं चांगलं!

नारायण- मग मी कुठे तुमच्या" ग्राह्यम् " च्या आड येत आहे? उलट या वाढप्याला तुमच्या ताटात भरपूर वाढायला- अगदी ढेकर येईपर्यंत वाढायला सांगतो आहे!

वासुदेव-ते ठीक आहे! पण फक्त तो तुमचा हटाळणीचा स्वर बदलला तर अधिक चांगलं होईल, नाही? माझ्या हटाळणी विषयी बोलत नाही मी! यांच्या! या मुलांची योग्यता आता जाणा आणि यांच्यासाठी केवळ शास्त्राधारात डोकं खूपसून बसू नका!

नारायण –-तुम्ही बोलता आहात हे वासुदेवशास्त्री? मला म्हणायचंय पंचायतनातले एक अधिकारी बोलत आहेत की एक व्यक्ती बोलते आहे?

वासुदेव –- हा वासुदेव शास्त्री बोलतो आहे! पंचायतनाचा एक पंच म्हणून बोलण्याला वासुदेवशास्त्री, ही व्यक्ती अधिकारी नाही, हे मला चांगलं कळतं नारायणभट्ट!

नारायण –-एवढं कळतं तर तुमचं तोंड चुटकीसरशी मुकं झालं पाहिजे!

वासुदेव –- वासुदेवशास्त्री बोलू शकत नाही?

नारायण- या न्यायपीठावरून तरी नाही, मुळीच नाही!

वासुदेव –-ठीक आहे! हा पहा मी खाली उतरतो! आता मी तुम्हाला ज्ञानदेवांचा पक्ष स्वीकारून विचारतो ; शास्त्रे ही समाजाच्या

अनुशासनासाठी आहेत हा तुमचा पक्ष मान्य! परंतु प्रश्न असा : शास्त्रे अगोदर झाली की समाज अगोदर वर्तत होता?

त्रंबक- हा अप्रतिम प्रश्न आहे! असल्या प्रश्नांना उत्तर द्यायला न्यायासन बांधलेलं नाही!

वासुदेव- (क्रोधाने) चूक आहे! एकदम विकृत कल्पना आहे तुमची!

ज्ञानेश्वर –- थांबा वासुदेवशास्त्री! शांत व्हा. (प्रखरतेने) न्यायासनानं कोणत्याही प्रश्नाला सादर असलं पाहिजे! प्रश्नांना बुजतं ते न्यायासन नव्हे! तुम्ही उत्तर देऊ इच्छित नसल्यास वासुदेवशास्त्रीच आपल्या प्रश्नाचं उत्तर तुमच्यासाठी देतील!

वासुदेव- उत्तर वेगळे द्यायला हवेच कशाला? वरवर विचार केला तरी समाज अगोदर वर्तत होता आणि त्याच्या वर्तनाच्या आधारे बऱ्याच कालानंतर ऋषीमुनींनी शास्त्रे लिहिली. हे स्पष्ट दिसेल! याचं प्रत्यक्ष उदाहरण आजकालच्या समाजातच दिसतं! आजकाल अस्तित्वात असलेले किती एक आचार शास्त्रात समाविष्ट नाहीत! केवळ रूढींमुळे सर्वमान्य आहेत! ' शास्त्राद्रूढिर्बलियसी ' हाच त्याना आधार!

a

नारायण –- ठीक आहे! तुमचं म्हणणं प्रमाण! आता तुमचा हा भ्रष्टाकार रूढ होऊन त्याला रूढीचं महात्म्य प्राप्त होईपर्यंत तुम्ही वाट पहा!

ज्ञानेश्वर –- असं सांगणं हा आडमुठ्यांचा पंथ! विचारवंतांचा, सुज्ञांचा हा मार्ग नव्हे! सुज्ञानी - लोकप्रमुखांनी समाजातील अन्यायाचं, केवळ शास्त्राधार नसल्यामुळे, चालणारं राहाट- गाडगं वेळीच आवरलं पाहिजे! शास्त्रं ही लवचिक ठेवली पाहिजेत! शास्त्रं लिहिली गेली त्या काळात काही एक विचार, त्याच्या अस्तित्वाच्या अभावामुळे,शास्त्रात समाविष्ट केला गेला नाही, तो आजच्या परिस्थितीत शास्त्र्यांनी करूच नये काय? शास्त्र्यांनी हे एवढं आपलं स्वातंत्र्य जपलं पाहिजे; समाजाच्या सोयीसाठीच, हे आवश्यक आहे! संन्याशाच्या मुलांची समस्या काही एक असामान्य परिस्थिती निर्माण होऊन पुढे आलेली नव्हती तोपर्यंत ठीक होतं! तथापि आज हा प्रश्न पुढे आल्यावर विद्वजनांनी त्याचा विचार न करणे हे मानवधर्माला, माणुसकीला सोडून आहे!

नारायण –-आत्मज्ञानाच्या चघळलेल्या चोथ्यानंतर पुन्हा मानव धर्म, माणुसकीची मचमच! ती संपल्यानंतर पुन्हा आत्मज्ञान! पुन्हा माणुसकी, पुन्हा आत्मज्ञान! असंच हे चालणार ना? थांब! आत्मज्ञानाची तुझी ही घमेंड जिरण्याची अगोदर वेळ येऊन ठेपली आहे! मग तुझ्या माणुसकीचं कातडही सोलून निघेल!

a

(भिकंभट्टाच्या कानाला काही काळ लागून स्वस्थ बसतो.भिकंभट्ट इतर काही आजूबाजूच्या ब्राह्मणांच्या कानी कुजबुजतो.ते झाल्यावर) चालेल ना भिकंभट्ट?

ब्रह्मवृंद –- चालेल! चालेल!

भिकंभट्ट –-(हर्षभराने) द्या टाळी! (दुसऱ्या एका ब्राह्मणाकडून टाळी घेतो.) काय कल्पना आहे! काय योजकता आहे!! खरंच तुमच्या बाबतीत 'योजकस्तत्र दुर्लभ :'! म्हटलं पाहिजे नारायणभट्ट.

नारायणभट्ट-आहे ना ! आ? (ज्ञानदेवास) आता पहा रे मुला! समोरून तो आडदांड लोहार पाण्यानं भरलेली पखालच पाठीवरून वाहून आणीत आहे! आमचं सर्व प्रतिष्ठान त्याला रेडा म्हणून ओळखतं! तो रेड्यासारखाच बलवान आणि रेड्यासारखाच मठ्ठ आहे! आत्म्यासंबंधी ज्या तू आतापर्यंत सव्वाहात गप्पा मारल्या आहेस त्या खऱ्या करून दाखवण्याचा आता प्रसंग आहे! तुझ्या तत्त्वज्ञानाप्रमाणं तो रेडा सुद्धा परमेश्वरच असला पाहिजे! मग त्याच्या त्या मठ्ठ डोक्यातून त्याच्या मुखावाटे वेदांची देववाणी प्रकट कर पाहू!

a

(काळू लोहार प्रवेश करतो. पाण्याने भरलेली पखाल त्यानं पाठीवर अगदी सहज पेलून धरली आहे. बावळटाप्रमाणे तो सर्वांकडे टकमक पहात आहे. नागदेवाला तो शोधीत आहे.)

काळू —-इकडं वरल्या अंगाला उभा राहीन म्हनला नाग्या. आन् हाय कुठे ह्यो? (शोध चालू ठेवतो)

ज्ञानेश्वर —-चमत्कार करून नमस्कार करून घेणे मला स्वतःला मुळीच आवडत नाही. तथापि तुमचं समाधान चमत्काराशिवाय होईलसं वाटत नाही. चमत्काराच्या नादानं साधकाचं आत्मसामर्थ्य क्षय पावत!

त्र्यंबक —- हा!आता अशी पळवाट शोधू नकोस!

ज्ञानेश्वर —-पळवाट शोधत नाही! मला कोणती किंमत द्यावी लागणार आहे हे मी अगोदर स्पष्ट केलं! आता बोलवा त्या रेडेश्वराला आपल्यासमोर!

नारायण —-अरे ए रेड्या, इकडे ये असा. या न्यायसनासमोर बैस!

काळू —- आं? मला हटकलं भट्टा?

a

गणेश –- हो.हो.इकडे ये.

काळू –- आलो-आलो. इथं नाग्या आलाय न्हवं?

नारायण –- ते मग बघू.अगोदर इकडे ये.

काळू –- रेड्या नावात माजा मोटेपना हाय असं नाग्या म्हनतो. तेच्या म्होरं तुमास्नी इचारुन खात्री करन घेणार हुतो. हाय नव्हं मोटेपना? मोटेपना असला तर मुकाट बसतो; नसला तर (मुठ आवळून) नाग्याला आणि तुमालाबी ह्यो रट्टा एकेक बसवतो!

नारायण –-फार मोठा आहेस तू! बस आता खाली! (सर्वजण हसतात)

काळू –- मग ठीक आहे.हा बसतो.आता काय करू आणखी?

(पखाल खांद्यावरून उतरून ठेवून, बजरंग बैठक मांडून बसतो. ज्ञानेश्वर त्याच्या डोक्यावर हात ठेवणार एवढ्यात -)

हे काय? माझं डोकं थंड हाय तसं!तुमचं तापलं असलं कुणाचं तर त्याच्यावर ओतायला पानी आनलय मी पखालभर.

a

ज्ञानेश्वर-(स्मित करून) माझं डोकंही थंड आहे रेडेश्वरा! पण यांची डोकी तापली आहेत.

काळू –-मग घे की वाईच यातलं पानी! नाहीतर मीच पखाल उपडी करतो!

ज्ञानेश्वर –-पखालीन यांचे डोकं थंड होणार नाही! तुझ्या डोकीवर मी हात ठेवला की, ती थंड होतील.

काळू –- हे काय इपरीतच बोलतुयास की!

ज्ञानेश्वर –- विपरीत आहे खरं ;पण तसंच आहे ते!

काळू ‾- काय म्हणतुयास काय की! हां, ठेव हात ठेव! तुझ्या म्हणण्याप्रमाणे होऊन जाऊ दे!

(ज्ञानेश्वर त्याच्या डोकीवर हात ठेवतात. एक दोन क्षणानंतर काळू निश्चल बनतो. त्याची समाधी लागते आणि त्याच्या मुखावटे वेदवाणी उमटू लागते. सर्वजण आश्चर्यस्तब्ध होतात!.)

ॐ सहस्त्रशीर्ष : पुरुष : सहस्त्राक्ष : सहस्त्रपात्
सभूमिं विश्वतोवृत्वा अत्यतिष्ठत् दशांगुलम्!

नारायणभट्ट –-(आश्चर्यस्तब्धतेचा भंग करीत) थांबव -थांबव. एकदम थांबव ही विटंबना! या शुद्राच्या मुखातून वेदवाणी स्त्रविली जात असण्याचा चमत्कारही सहन होत नाही!

(ज्ञानेश्वर हात काढून घेतात. काळूचे तोंड थांबते; पण तो काही क्षण समाधीच्या स्थितीतच स्तब्ध राहतो.)

वासुदेव –-(शिरसाष्टांग नमस्कार घालून) ज्ञानदेवा, आपण साक्षात परमेश्वराचे अवतार आहात! आपण शुद्ध परब्रम्हीचे ठसे आहात!

काळू–-(ज्ञानेश्वरांचे चरण धरून) परमेसुरा हात का उचलला? ठेवा, ठेवा डोईवर माझ्या (हात पकडून) अख्या अंगात कसं कापरं भरल्यावानी झालया मला.लई बुद्धी आल्यागत झालं हुतं! माझा आज अक्षी उद्धार करा !! (ज्ञानेश्वर त्याला उठवून हृदयाशी धरतात. ज्ञानेश्वरांच्या नेत्रातून धारा वाहू लागतात.)

ज्ञानेश्वर –-तू शूद्र ना! तुला वेदवाणी उच्चारण्यास प्रतिरोध आहे; यांचा!

वासुदेव- (नारायणभट्टास) नारायणभट्ट. आता शुद्धिपत्र देण्यास काही हरकत आहे? आपली सर्व बाजू या अखेरच्या चमत्काराने या पुरुषोत्तमान सिद्ध केली ना?

नारायण- चमत्कार केला हे आम्ही पाहिलं, ऐकलं! पण चमत्कार, गारुड असलं काही केलं म्हणून शास्त्राज्ञा काय कुणी ओलांडली आहे? हे शुद्ध परब्रम्हीचे ठसे आहेत हे मान्य; तथापि या जगात अवतार घेताना त्यांनी या जगाच्या नितीनियमाना अनुसरून नको का होता जन्म घ्यायला? या जगात यायचं म्हणजे या जगाचे निती- नियम पाळलेच पाहिजेत ; अंतएव यांना शुद्धिपत्र देता येत नाही! न्याय म्हणजे न्याय!

वासुदेव –-आपणाला शुद्धिपत्र नाकारुन हे पैठणचे कर्मठ, हेकट पंडित आपला कर्मदरिद्रिपणा प्रकट करीत आहेत! परंतु यामुळे यांचं भविष्यकाळात हासं होणार आहे! यांचा हा निर्णय म्हणजे तुम्हा भावंडांचा दिग्विजय समजा! निवृत्ती ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई!! तुमचा त्रिवार जयजयकार!

काळू –-बोला भट्टानू! तुम्हीबी यांचा जयजयकार बोला! यास्नी सुद्धिपत्तर द्या!

नारायण-आम्हाला शुद्धिपत्र तर देता येत नाहीच!आणि न्यायासनाचे अधिकारी म्हणून यांचा साधा जयजयकारही बोलता येत नाही!

काळू –- काय? यांचा जयजयकार न्हाई करनार?

a

वासुदेव –- यांच्या जयजयकाराच्या गर्जना करणे तुम्हाला अवघड जातं?

काळू –- माझा घण हतं हुवा हुता. हं म्हंजी टाळकीच सडकून काडली असती!

नारायण –-नाही! त्रिवार अशक्य! (सभेत गोंधळ सुरू होतो)

काळू –- बोला,लोकांनु, निवृत्ती ज्ञानोबांचा
लोक –- जय!

काळू –- हा!भटानू तुम्ही बी बोला मुकाट -

नारायण –-(काढता पाय घेत) नाही!
((धावत सुटतो. काळू 'पकडा पकडा त्याला 'असे ओरडतो. सर्व लोक 'पकडा पकडा' म्हणून धावू लागतात. सर्वत्र गोंधळ. नारायणभट्टा मागोमाग सर्व ब्रह्मवृंदम धावत सुटतो.)

ब्रह्मवृंद –- (धावता धावता) नाही!नाही!!

पडदा

अंक दुसरा समाप्त

a

# अंक ३- प्रवेश १

–

(स्थळ -प्रवरेच्या काठचे निवासे. प्रवरेचे वाळवंट. सकाळची वेळ स्नान करण्याच्या निमित्ताने भिकंभट्ट व शंकरभट्ट प्रवरेच्या तीरावर येतात.)

भिकमभट्ट –- अरे वा! शंकरभट्ट, स्नान उरकून चालला वाटतं!

शंकर –- छे हो! काय करायचंय एवढ्या सकाळी या नदीच्या पाण्यात बुचकळी मारून? काय अडलंय कुणाचं आमच्या स्नानावाचून? - तुमचं झालं असेल स्नान!

भिकं –- आत्ता स्नानाच्याच नावानं अखेरचं स्नान करायचं राहिलं आहे! स्नान करायचा योगच अलीकडे बऱ्याच दिवसात येत नाही! जवळजवळ सोडूनच दिलंय मी स्नान करण्याचं! कुणाच्या अखेरच्या यात्रेला जाण्याचा प्रसंग मध्येच उद्भवला की तेव्हा मात्र स्नान करणं भाग पडतं!

शंकर –-वा!खूप केलीत भिकंभट्ट! माझ्यासारखीच एकंदरीत पाळी आली तुमच्यावर! आश्चर्यम् अहो आश्चर्यम्! पण काय हो, थट्टा तर करीत नाही तुम्ही माझी? हजार लटपटी खटपटी करून कुठं सत्यनारायण,

a

कुठे पूजा, कुठे श्राद्ध, कुठे व्रत, कुठे वैकल्य,कुठे पितृकार्य साधणारे पट्टीचे ब्राह्मण तुम्ही! तुमचा असा फजितवाडा व्हावा? संभवनीय नाही!

भिकमभट्ट –-अरे बाबा आता सगळं संभवनीय आहे!

शंकर –- नाहीच! हा, मुळीच नाही! एखादे वेळी उंदराला तळलेल्या खमंग पदार्थाचा वास येणार नाही ; पण तुम्हाला गावात कुठं कुठं, काय कार्य निघाली आहेत याचा वास आलेला नाही, असं होणार नाही!

भिकमभट्ट –- त्यापेक्षाही एक अशक्य गोष्ट ऐकायचीय तुम्हाला? आम्हा ब्राह्मणांच्या मूळ नक्षत्रावर जन्मलेला तो ज्ञान्या -तो इथं आता नेवाशालाही आमचा पिच्छा पुरवायला आला आहे!

शंकरभट्ट –-काय म्हणता काय? तिथं पैठणला आम्हाला जगणं अशक्य करून टाकलं! व्रतवैकल्यासंबंधी, देवदेवतांसंबंधी लोकांच्या मनात अप्रीति निर्माण करून आम्हाला संसारातून उठवलं ;आणि आता पुन्हा हा शनी इथंही आला!

भिकमभट्ट –-नुसता येऊन राहिला नाही ; इथही त्यानं तोच उद्योग चालविला आहे! देवदेवतांची तिथं पैठणच्या भर सभेत कशी टवाळी त्यानं

a

केली, हे चांगलं स्मरत ना? तोच प्रकार त्याने आता सऱ्हास इथंही आरंभिला आहे! आम्हा ब्राह्मणांच्या कर्मठपणावर, नित्यनैमित्तिक कर्मकांडावर कोरडे ओढण्याचा त्यानं नुसता सपाटा चालविला आहे! शुद्ध पाखंडांचं बंड उभारलं आहे! आमच्या वैदिक देवतांची टवाळी म्हणजे आहे काय हे?

शंकरभट –-आणि हे सारे अज्ञजन - ही सारी आंधळी सेना आता त्याच्या भजनी लागली आहे म्हणे! म्हणजे आता आटोपलंच सारं! कलियुग आहे हे कलियुग भिकंभट्ट! पापाचा भार पृथ्वीवर वाढत जाणार!

भिकंभट –-तर हो काय? या संन्याशाच्या पोरांनी नुसता भ्रष्टाकार माजविला आहे! यांनी एकवार भूभुत्कार करावयाचा अवकाश की त्यांच्यामागून लोकांनी भो भो चा गळा काढून नुसता कोलाहल माजवलाच म्हणून समजावं! एवढं सत्यनारायणाचं कडक दैवत! एवढी साधूवाण्याची त्यानं भंबेरी उडविली,पण तोही या पापांच्या बोलक्या मर्कटांना भ्यालेला दिसतो! कुणीही सत्यनारायण बोलत नाही तरीही तो आपला गप्पच! म्हणजे आहे काय हे?

शंकर –- आणि झाडून साऱ्या देवतांनीही त्यांच्यापुढे शरणागती पत्करलेली दिसते! रावणानं, पुराणांतरी नव्हतं का छत्तीस कोटी देवांना दास केलं? तद्वतच ही वेळ आली आहे सांप्रत! या ज्ञान्यानं सर्व देवांना

a

कैद करून रावणाप्रमाणेच त्यांना पायाखाली पालथ घातलं आहे जणू! कुणी कुणाला नवस बोलत नाहीत, की कुठे ब्राह्मणभोजन होत नाहीत! पाहिलंत हे पोट कसं वाळलेल्या खारकेसारखं झालं आहे!!

भिकंभट्ट-तुमचं पोट वाळलेल्या खारके सारखं होऊन निदान जाग्यावर तरी शिल्लक आहे!पण पाच-पन्नास लाडू सहज लीलेनं पचवू शकणारं हे माझं पोट कसं अगदी पाठीशी एक जीव होत चाललं आहे पहा!! वाटतं की आता आपल्याला पोट आहे की नाही? अशी उपासमार होते आहे म्हणता! छे,छे,छे! पोटात सडकून दुखलं आहे, असा प्रसंग गेल्या दोन वर्षात एकदाही आलेला नाही!

शंकरभट –- तरी बरं! हे लोक निदान लग्नमुंजीची तरी कदर करताहेत! नाही तर सारंच आटोपलं असतं!

भिकंबट्ट –- पण लग्न का बाराही महिने असतात? लग्न मुंजीचा हंगाम वर्षातील चार महिने ;आठ महिने नुसता ठणठणपाळ!

शंकरभट –-शिवाय लग्नाच्या कार्यातही कुठे धुमधडाका असतो आजकाल? आपलं जेवढ्यास तेवढं! दक्षिणा हातावर पडायची तीही मोजकी!

a

भिकंबट्ट —-आणि माणसामाणसांची लग्न लागण्यापूर्वी अगदी नेमान, दरवर्षी,अगदी ठरलेल्या दिवशी घरोघर होणारी तुळशीची लग्न होतात कुठे हल्ली? या लग्नात आपले हात थोडे का ओले व्हायचे?

शंकरभट्ट —-च् च् च्! तिथं पैठणात आम्हाला नको जीव केला ; आणि इथंही हा राहू ग्रासायला आला! आजकाल ब्राह्मणांना कुणी वालीच राहिला नाही!

भिकमभट्ट —-तरी त्यामुळे तुमचं काही विशेष नुकसान झालं आहे असं नाही! अहो किती झालं तरी तुम्ही त्रीकर्मी ब्राह्मण, तुम्हाला पूर्वी तरी विचारीत होतं कोण?पण आम्ही षट्कर्मी ब्राह्मण मात्र आज साफ बुडालो आहोत!

शंकरभट्ट —- ठाऊक आहे हो तुमचा षटकार्मी टेंभा! मोठे आले आहेत सांगायला! जग हा एक निव्वळ वेड्यांचा बाजार आहे  बाजार! खऱ्या विद्वत्तेला ते मान देतेच कुठं? आमच्याकडे जी काय विद्या आहे ती या जगाला कळते कुठे? तुमच्यासारख्यांच्या खटपटी लटपटीनाच ते भुलतं! या जगात विद्वत्तेच्या नावानं शंख असला तरी चालतो! हजार खटपटी लटपटी,खोटं नाट दडपून गप्पा ठोकण्याची हातोटी असली की बस्स! पण खटपटी लटपटी म्हणजे काही विद्वत्ता नव्हे, हे आम्हाला कळतं!

भिकंभट्ट- ठाऊक आहे हो तुमची पण विद्वत्ता! वेदांचे पाठांतर तुमचं काय किंमतीचं आहे, हे मला सांगू नका! वेदातलं एक अक्षर तरी तुम्हाला येतं का? चारी वेद कसे मुखोद्गत आहेत माझ्या!

शंकर –- ही कितवी गप्प ठोकलीत भिकंभट्ट? चार वेदातले इकडचे तिकडचे चार तुकडे तरी पाठ येतात का? अहो सगळी वार्ता आम्हाला आहे म्हटलं!

भिकंभट्ट –- चार तुकडे सुद्धा पाठ येत नाहीत? म्हणू?

शंकरभट्ट –-काही नको!- पण तेवढेच ना? चारी वेद काही संपूर्ण पाठ येत नाहीत तुम्हाला?

भिकंभट्ट –-चार तुकडे तरी येतात ना  पाठ? पण तुम्हाला तेही नाही!

शंकरभट्ट –- पण त्यातला काही अर्थ कळतो का तुम्हाला? अर्थाविना केवळ पोपटपंची आहे तुमची!

a

भिकंभट्ट –- पोपटपंची तरी आहे ना? पण वेदांच्या पोथीची पानं काळी का गोरी ;तेही पाहिलेलं नाही तुम्ही!!

शंकरभट्ट –- आता हा वाद हवाच कशाला? विद्वत्तेच्या नावानं आम्ही सगळेच शंख! सगळेच उडीद! वाद मात्र फुकाचा! उडदामाझी जे काही काळे गोरे निवडायचे, तेवढेच!!

भिकंभट्ट –- आता वाद मिटवायचा म्हटलं तर,तुमचंच खरं आहे शंकरभट्ट! आम्हात विद्वान पंडित हे अपवादात्मकच! वासुदेवशास्त्रासारखा विद्वान, पण विद्वत्तेची घमेंड नसणारा गृहस्थ विरळाच! नारायणभट्ट ही विद्वान खरा; पण आक्रमकताळेपणानं, विद्वत्तेच्या घमेंडीनं वाया गेला!

शंकरभट्ट –-पण या सर्व विद्वानांची भंबेरी उडविणारा ज्ञानदेव निघालाच की नाही!

भिकंभट्ट-त्यांची नाही भंबेरी उडवली त्यानं! भंबेरी उडविली ही आमच्यासारख्या उडदांची -उडदी ब्राह्मणांची!! (हसतो)

शंकरभट्ट –-ब्राह्मणांची कशाला म्हणता? तो रेडा लोहार आजकाल म्हणतो याप्रमाणे भटारांची म्हणा ना! (हसतो)

भिकंभट्ट –-(गंभीर होऊन) अहो पण शंकरभट्ट, तुम्ही आम्ही बोलता- बोलता, तुमची -आमचीच निंदानालस्ती करीत आहोत! आणि त्या ज्ञान्याची -आमच्या शत्रूची स्तुती करीत आहोत!

शंकरभट्ट- होय हो होय! काय गंमत आहे पहा! ज्ञान्या तर आमचा मुळावरचा शत्रू! आणि त्याचीच आम्ही स्तुती करीत आहोत! पण तुम्हीही कसे काय भुललात बुव्वा?

भिकंबट्ट-मी कसला भुलतो भिकमभट्ट! मी त्या ज्ञान्याला बळकट खीळ घालण्याची व्यवस्था करून बसलो आहे!

शंकरभट्ट –-या भोळ्या शंकराप्रमाणं मीही शंकर भोळाच! तुमच्यासारखा मनुष्य स्वस्थ राहणार नाही, हे सुद्धा लक्षात येत नाही माझ्या! असो. तुम्ही काय करायचं ठरविलं आहे?

भिकंभट्ट –-अहो, हे ज्ञान्याचं लचांड आहे! मला स्वतःला पेलणार आहे थोडंच!! चमत्कार करून एकदम भस्म करील मला!

शंकरभट्ट- छे! महा भयंकर माणूस आहे तो!

भिकमभट्ट-भयंकर म्हणजे काय! एकदम भयंकर! इथं नेवाशालाही त्यानं आमच्या कर्मकांडावर टीकास्त्र सोडलंच आहे ; भरीला संस्कृत ग्रंथाचा मराठीत अनुवाद करण्याचा संकल्प सोडून गीतेवर मराठीत टीका सांगतो आहे रोज!

शंकरभट्ट –- काय ठक आहे हो अट्टल!

भिकंभट्ट –-महाठक! - तर काय? आणि त्याच्या प्रवचनाला इथले सर्व जातीचे -ब्राह्मणांचे काही अपवाद वगळून- म्हणजे तुमच्या - आमच्यासारखे! सर्व लोक जातात!

शंकरभट्ट –-छे!छे! छे! काय भ्रष्टाकार आहे! बाकी भ्रष्टाकारांतून जन्माला आलेल्या कार्ट्यापासून अधिक ते काय अपेक्षिणार म्हणा! साराच भ्रष्टाकार आणि का हो भिकंभट्ट! ही देवभाषा देणारे देव झोपले आहेत का हो?

भिकमभट्ट-झक मारू द्या त्या देवांना तिकडं! त्यांचं काय बिघडणार आहे! आता आम्हा ब्राह्मणांची विद्या सर्वांच्या हाती जाऊन आमच्या पोटावर पाय येणार त्याचं बोला!

शंकरभट्ट –-ते पाहूच हो! पण भगवानानच कुठे - कुठे बुवा?

भिकमभट्ट –- जाऊ द्या हो! पुढे सांगा!

शंकरभट्ट-भगवानानं म्हटलं आहे ना ' धर्म संस्थापनार्थाय संभवामि युगे युगे!' - त्याबद्दल बोलत होतो! मग असा हा अधर्म या संन्याशाच्या पोरांकडून माजविला जात असता तो शेषशाही नारायण खरोखरच झोपी तर गेलेला नाही?

भिकंभट्ट –-हा टोमणा आम्हाला कळतो बरं शंकरभट्ट! तुम्ही शैवानी आम्हा वैष्णवांच्या विष्णूला एवढं काही हिणवायला नको! मी म्हणतो, लागली असेल एखादी डुलकी आमच्या नारायणाला! पण तुमच्या प्रलयंकर शंकरानं डमरू वाजवून एऱ्हवी जे विश्व हादरविलं असतं ते त्यानं फोडून तर टाकलेलं नाही! किमान शंखध्वनी तरी करायचा त्यानं!

शंकरभट्ट –-जाऊ द्या! सध्या आमच्यावरच आमचे देव उलटलेले दिसतात! आता तुम्ही- आम्हीच, तुमच्या -आमच्या पोटावर पाय आलेला आहे म्हणून शंख केला पाहिजे!

भिकंभट्ट –-केलाय का तुम्ही शंख? म्हटलंय का निदान 'हाय'? उलट हाय खाऊन मात्र बसलात!आता मी कोणती कामगिरी केली आहे म्हणाल? ऐका! ऐकूनच थक्क व्हाल!

शंकरभट्ट –- ऐकवा तर पाहू!

भिकंभट्ट-या ज्ञान्याचा नक्शा उतरायचा म्हणजे तसाच असामान्य माणूस पाहिजे, नाही का?

शंकरभट्ट –- काय बोलणं आहे की काय?

भिकंभट्ट –-तर तात्पर्य हे की नारायणभट्टाना मी हा सर्व प्रकार कळविलेला आहे! गीतेचा मराठीत अनुवाद चाललेला ऐकून ते अगदी दुर्वासासारखे चवताळून उठतील अशी माझी अटकळ होती ; आणि झालं ही तसंच! ते आज इथं नेवाशात येणार आहेत. आज संध्याकाळीच ज्ञानेश्वराच्या सभेला जाऊन त्यांच्या करवी ज्ञानेश्वराची भंबेरी उडविण्याचा विचार आहे!

शंकरभट्ट –-वा! याला म्हणतात डावपेच! नाही तर आम्ही!!

a

भिकंभट्ट-वा! तुम्ही काय कमी आहात? तुमचा शंखनाद आहेच की!

शंकरभट्ट –-तसं नाही म्हणालो मी! माझं म्हणणं असं की आम्ही फार तर स्वस्थ बसलो असतो! हात चोळीत!! नाहीतर दिला असता हाही गाव सोडून!

भिकंभट्ट –-अशा किती स्थळी यात्रा करणार तुम्ही? ते काही उपयोगाचे नाही! आता सोक्षमोक्ष लावायचाच! तस्मात युद्धाय युजस्व! मामनुस्मर युध्यच !

शंकरभट्ट- हो -हो!पण वासुदेवशास्त्र्यांनाही बोलावलं असेलच म्हणा तुम्ही!

भिकंभट्ट –- शंकर भट्ट तुम्ही अगदीच कसे शंख हो? शंक म्हणायचं होतं बरं मला! आम्ही सारे निशंक ;- म्हणून म्हणालो! चुकून महाप्राण बाहेर पडला पहा!

शंकरभट्ट- बाकी महाप्राण बाहेर पडायचीच आता वेळ येऊन ठेपली आहे म्हणा!!

भिकंभट्ट –- पण तुम्हाला सांगायचं होतं ते असं की वासुदेवशास्त्री हा प्राणी आता साफ कामातून गेला आहे! ज्ञान्याच्या भजनी- पूजनी लागून अवघा ज्ञानाळला आहे.

शंकरभट्ट- काय म्हणता काय?

भिकमभट्ट –-आणखी ऐका : तो ज्ञान्याबरोबर इथं नेवाशालाही आला आहे! त्याच्या प्रवचनाला हा ही हजर असतो!

शंकरभट्ट –- छे! छे! छे!अगदी कहर झाला! आता कसं करायचं हो? आणि काय करायचं?

भिकमभट्ट –-आता तेच करायचं! आणि तसंच करायचं! कसं? आलं लक्षात?

शंकरभट्ट –- (मान हलवीत) आलं, आलं! (हसतो) पण वासुदेव शास्त्री ज्ञानदेवाच्या बाजूला असताना नारायणभटांची मात्रा काय चालणार?

भिकंभट्ट- असे हातपाय गाळलेत की काही नाही चालणार! पण जरा आत्मविश्वास बाळगलात की सारं ठीक होईल! तुम्ही फक्त आमच्या मागं रहा, म्हणजे पुरे!

शंकरभट्ट-मागंच काय? तसा मी पुढेही राहीन तुम्हा सर्वांच्या! (दूरवर लक्ष लावून निरखून पाहात) पण हे समोरून कोण येत आहेत?

शंकरभट्ट-अहो तो काळया लोहार ;आणि तो -तो कोण बरं?- हो सांगायचं राहिलंच एक! तो काळया लोहारही या ज्ञान्याच्या नादी लावून इथं आला आहे! त्या ज्ञान्याच्या चरणी या मूर्खानं लागावं यात आश्चर्य नाही, पण त्या वासुदेवशास्त्र्यांनीही लागावं हे महदाश्चर्य आहे! (काळू लोहाराच्या दिशेने पाहात)पण त्या काळया बरोबर हा दुसरा कोण बरं? काही ओळखून येत नाही! शंकरभट्ट, असं करू! हे काय गोष्टी बोलतात हे आपल्याला ऐकायला मिळालं पाहिजे. आम्ही ते इथून जाईपर्यंत त्या झाडाआड लपून राहू! चला. (हे दोघे लपतात. काळू व नागदेव बोलत प्रवेश करतात)

काळू –- मी तुला इस्पष्ट न्हाई का बोललो? आता मी माघारी न्हाई यायचा!

नागदेव –- आरं, पर तुजी बाईल तकडं पैठणात तुझ्यासाठी जीव टाकूनशेनी बसलिया!

काळू –- माझ्यासाठी नव्हं -रेड्यासाठी म्हन! तिला काळू लोहार होवाय थोडाच! आन् माझ्यातला रेडा तर कवाच खलास झालाय!

नागदेव –- कुनी सांगितलं तुला ह्ये? आरं तुला गिन्यान आलेलं ऐकून तिचा जीव कित्ती मोठ्ठा झालाय! तुझ्या तोंडातनं येद बोली भाइर पडल्यालं

a

ऐकून आपलं हात आभाळाला लागल्यावानी तिला झालं! पन् तू संसार सोडून या ग्यानबाच्या मागं आल्यावर तेच आभाळ तिच्या डोईवर कोसळल्यागत झालं! ती तुझ्या वाटकडं डोळे लावून बसलीया! तिन अन्न पानी बी वरज्य केलया,आन्- म्हून तुला हटकाया मी आलो हाय!

काळू –- नाग्या,कुनाला सांगतोस ह्ये! कुनाला गप्प मारतोस ही? अरं माजी पिडा टळली म्हूनशान ती दुप्पट खात पीत असंल् आता!

नागदेव –- काय तरी बोलतुयास मर्दा!

काळू –- काय तरी काय? खरं राबायचं कोन?- तीच! -तिच्याच कमाई वर चरून मस्त झालो मी! माझ्याबिगर तिचं काय नडायचंय? हां! तिचा दम भरून घ्यायला कुणी जवळ नसंल म्हणून तिला चुकल्यामाकल्यागत वाटंत असेल! आन् पखाली भरभरून पानी आनायला कुनी न्हाई म्हून दुक्क वाटत असंल!

नागदेव –- (मान हलवून) च् च्.....च् च्! न्हाई न्हाई! चुकतुयास तू! तुझ्यावर तिचा किती जीव हाय ह्ये तूच परत्यक्ष आल्याबिगार न्हाई कळायचं तुला!

काळू –- नाग्या! आता लई झालं! काइ बी थापा मारूनशानी तू मला पुना दावणीला बांधाय बघतुस! दुसरं काय? पन् अशानं न्हाई मी बधायचा !

नागदेव –- अरं देवाची आन्! तुझ्या ग्यानबादेवाची आन्! खोटं न्हाई मी सांगत! सुटल्यो म्हन!

काळू –- सुटल्यो.पर नाग्या, ग्यानबामाऊलीचा वसौट सोडवत न्हाई रं! तिच्या तोंडचा एकेक शबुद ऐक तर खरा! किती गोड गोड हाय म्हनतुस! किती गिन्यान भरलाया त्याच्या शबुदात! खरी ग्यानदेवी हाय ती! तू आज ऐकायला ऱ्हाच! आता सांजेचं चार वाजता, म्हाळसाच्या देवळात सुरू होईल सभा! तुबी, संसार सोडून हतच ऱ्हातो म्हनशील!

नागदेव –- काय काय सांगत्यात रं त्ये?

काळू‌–- अरं आत्मगिन्यान म्हंजी आत्म्याचं ग्यान! आन् लई काय काय सांगत्यात! ह्या बामनांनी आम्हास्नी येद न्हाई वाचू दिला. तवा आता ह्यो अवतारी पुरुष आम्हास्नी गीताईच गिन्यान म्हराटीतन सांगतु. इद्या,या बामनांनी सवसकृताच्या पेटीत ठिवली,आन् वरती

a

हरकतीचं हे SS कुलूप ठोकलं! ती सारी इद्या ग्यानबा दोन्ही हातांनी आमा रंजल्यागांजल्यांना वाटीत सुटल्याती!

नागदेव –- खरं म्हणतुस का काय?

काळू –- व्हय तर! खोटं कशापायी सांगू!

नागदेव- आन् या नेवाशातली सारी बामनं मुकाट बसल्याती म्हनतुस?

काळू –- अरं सारी जळत्यात आतनं! वासुदेवशास्त्र्यावानी सगळीच कुठं भली हैती? लई हेकट भटांची जात! पन करत्यात काय? संबुर येऊन ग्यानबाला अडवायची कुनाची छाती न्हाई!

नागदेव –-अरं वा! पन ते आत्मगिन्यान म्हंजी काय हाय रं?

काळू –- आत्मगिन्यान म्हंजीच परमेशुराचं गिन्यान.परमेशुर एक हाय; ह्या विश्वामंदी परमेशुरच भरून उरलाय् -अक्षी तुझ्या नि माज्यात बी हाय! आमचा आत्मा म्हंजे बी परमेशुरच हाय! परमेशुराला वळकनं म्हंजी आत्म्याला वळकनं!

a

नागदेव- हे कसं काय बा? काय बी कळना मला-

काळू ¯- अरं परमेशुर मरतो का?

नागदेव –- न्हाई!

काळू –- आमचा आत्मा भी मरत न्हाई! नासतो तो ह्यो साडेतीन हाताचा हाडामासाचा गोळा ; आत्मा तसाच ऱ्हातो!

नाग –- मग मेल्यावर काय हुतं त्येचं?

काळू –- अरं आत्मा मरत न्हाई!तो सदास जिता ऱ्हातो! मरतो त्यो ह्यो देह!

नागदेव –- न्हाई पर आत्म्याचं हुतं काय?

काळू –- त्यो करमापरमान दुसरा देह धारन करतो.

नागदेव –- अस्सं?

a

काळू —-हा!-आमी हे कुडतं फाटल्यावर नवं शिवत न्हाई का? तसा त्यो नवा देह धारन करतो! जैसे जीर्ण वस्त्र सांडिजे, मग नूतन वेढिजे, तैसे देहांतराते स्वीकारिजे चैतन्यनाथे!

नागदेव —- वा! गम्मतच हाय की ही!

काळू —- खरं इचारशील तर हतं नासतच न्हाई कुनी!

नागदेव —- ऑ? देह बी नासत न्हाई?काय तरीच तुजं?

काळू‾- माझं न्हाई! ग्यानदेवांनीच ओव्या रचून सांगितल्या ह्ये! नासत न्हाई म्हंजी कुटंच काई कमी जास्त होत न्हाई!

ऐक :

हे उपजे आणि नाशे | ते मायावशे दिसे |
एऱ्हवी तत्वतां वस्तू जे असे, ते अविनाशी ||
जैसे पवने तोय हालविले | आणि तरंगाकार जाहाले |
तरी कवण कें जन्मले | म्हणो ये तेथ ||
तेंचि वायूचे स्फुरण ठेले | आणि उदक सहज सपाट जाहाले |
तरी आता काय निमाले| विचारी पा ||

- काय,कळलं काय?

नागदेव –- वा न कळायला काय झालंय,? आन किती गोड ओव्या हैती ह्या!

काळू –- हा गोड तर हैतीच! ग्यानबाची वाणी हाय ती! ग्यानबा सांगत्यात - हे जग म्हणजे नुसता भास हाय, भास!

कसा ते ऐक :

का पूर्ण कुंभ उलंडला | तेथ बिंबाकार दिसे भ्रंशला ||
परी भानू नाही नासला | तयासवे ||
तैसे शरीराच्या लोपी | सर्वथा नाश नाही स्वरूपी |
म्हणऊनि तू हे नारोपीं | भ्रांति वाया |

नागदेव –- अहाहा! किती गोड वाणी हाय ही! काळ्या, आजचा दिस मी ऱ्हातोच ऐकाया ; पन उद्या तरी तू येशील माझ्या संगट माघारी?

काळू–- आरं आता मी बावाबैरागी हुनार हाय! मी आता माघारी न्हाई यायचा! लेका अमृत प्यायला मिळत असल्यावर पुन्हा डबक्यातलं पानी कोन पीत बसल् व्हय?

नागदेव- अक्षी तुझ्या ग्यानदेवानं सांगितलं तरी बी?

काळू‍- ते म्होरच्या म्होरं बघता यील! आता चल बिगी बिगी! येळेवर जायला होव म्हाळसाच्या देवळात!

(नागदेव व काळू जातात)

(झाडामागून भिकमभट्ट व शंकरभट्ट प्रवेश करतात)

भिकंभट्ट –-ऐकलंत शंकरभट्ट! किती जलाल विष पेरलं आहे आम्हा ब्राह्मणाविरुद्ध! हे सारे कुणबट - कुळवाडी आजकाल ब्राह्मणांना नुसतं बामणं, भटं म्हणूनच थांबत नाहीत ; त्या शब्दांचा उच्चार शिव्यांच्या कोंदणासकट करतात भडवे! ब्राह्मणांना आजकाल कुणीच मान देईनासं झालं आहे! आणि हे सारं त्या ज्ञान्यांचं कृत्य बरं! ज्ञान्या म्हणजे ब्राह्मणांचा उद्धार करणाऱ्या शेलक्या शिव्यांचं उगमस्थान!

शंकरभट्ट- बरोबर बोललात भिकमभट्ट! पण म्हणावं ब्रह्मतेज काही फार वेळ निस्तेज राहणार नाही! किती झालं तरी आम्ही ब्राह्मण आहोत! उच्च वर्णांमध्ये सर्वश्रेष्ठ आहोत! तेजस्वी लोक आहोत!

भिकंभट्ट –- आणि ते आमचं ब्रह्मतेज आम्ही आजच दाखविणार आहोत! नारायणभट्टांचं नेतृत्व असल्यावर आम्ही त्या कुणबटांची दाणादाण

a

उडविल्याविना राहणार नाही! चला! आज आपण अगदी सर्व शक्ती पणाला लावून विरोधाची सिद्धता करू! चला, आता नदीत चार बुड्या मारून -

शंकरभट्ट –-ते, आता बुड्याबिड्या काही नाही! मी तर प्रतिज्ञाच करतो, ऐका : त्या ज्ञान्याची त्याच्या सर्व टोळक्यासकट आज दाणादाण नाही उडाली तर हा शंकरभट मरेपर्यंत स्नान करणार नाही!

भिकंभट्ट –- आणि मी तर जन्मोजन्मी स्नान करणार नाही! बोला!- आता एकच लक्ष - मोहिनीचे देवालय!

शंकरभट्ट –- मोहिनीचे देवालय! (जातात)

(पडदा)

-

प्रवेश २ रा

–

( स्थळ:-' महालया 'चे' देवालय - नेवासे.
वेळ : संध्याकाळचे सुमारे चार वाजलेले आहेत)

(ज्ञानेश्वर महालयाच्या देवालयातील खांबाला टेकून कृष्णाजीन पसरलेल्या चौरंगावर आसनस्थ झाले आहेत. त्यांच्या उजव्या अंगाला निवृत्ती, सोपान आणि मुक्ता बसली आहे. डाव्या अंगाला समोर एक दिवटी. तिच्यात ज्योत नाही. पलीकडे काळू लोहार, त्याचा मित्र नागदेव आणि वासुदेवशास्त्री ही मंडळी प्रामुख्याने दिसते. देवळातील आवार श्रोते मंडळींनी फुलून गेले आहे.पडदा उघडतो.)

ज्ञानेश्वर –- (हातात बोरू घेऊन पोथीवर ओव्या लिहीत असतानाच पडदा उघडला जातो. पुढील ओव्या लिहिता लिहिता श्रोतेमंडळीकडे पाहून साभिनय मोठ्याने म्हणून दाखवीत आहेत!)

जयाचे केलिया स्मरण | होय सकळ विद्यांचे अधिकरण |
तेचि वंदू चरण | श्रीगुरुचे ||१||
जयाचेनि आठवे | शब्दसृष्टि आंगवे |
सारस्वत आघवे | जिव्हेसि ये ||२||

a

वक्तृत्व गोडपणे | अमृताते पारुष म्हणे |
रस होती वोळगणे | अक्षरांसी ||३||
भावाचे अवतरण | अवतरविती खुण
हाता चढे संपूर्ण | तत्वबोध. ||४||
श्री गुरुचे पाय | जै हृदय गिवसूनि ठाय
तै एवढे भाग्य होय | उन्मेषासि ||५||
ते नमस्कारूनि आता | जो पितामहाचा पिता|
लक्ष्मीयेचा भर्ता |ऐसे म्हणे||६||

श्री भगवानुवाच -
इदं शरीरं कोंतेय क्षेत्रमित्यभिधीयते |
येतद्यो वेत्ति तं प्राहु:क्षेत्रज्ञ इति तद्विद:||१||

तरि पार्था परिसिजे | देह हे क्षेत्र म्हणिजे
हे जाणे तो बोलिजे | क्षेत्रज्ञ एथें||७||

(स्टेजवरील दिव्यांचा प्रकाश हळूहळू अंधुक होतो. काळू लोहार स्टेजमागे जाऊन पेटलेला काकडा घेऊन येतो. दिवटी मधली वात वर सरकवतो. तेल घालतो. आणि ज्योत पेटवितो. बराच वेळ निरूपण झाले, असा याचा अर्थ.)

a

आता या पुढील निरूपणात परमात्म्याच्या प्रकृति- पुरुष व्यवस्थेचे विवेचन होणार आहे. तरी श्रोतियांनी अवधारावें-

प्रकृति पुरुषं चैव विध्द्यनादी उभावपि |
विकारांश्च गुणाश्चैव विध्दि प्रकृति संभवान्||१९||
तरी पुरुष अनादि आथी | तैंचि लागोनि प्रकृति
सवे सरिसि दीवोराती | जया परी ||
का रूप नोहे वायां | परी रूपा लागली छाया |
*निकण वाढे धनंजया. | कणेसी कोंडा ||.
तैसीं जाण जवटें.* |. दोन्ही इथे एकवटे |
प्रकृति पुरूषे प्रगटे |अनादिसिध्दे ||
इये अनाने नांवे | परि निरूप्य आन नोहे
हे लक्षण न चुकावे |पुढतपुढती ||

पुरुष: प्रकृतीस्थो हि भुंक्ते पुर प्रकृतिजान् गुणांन्
कारण गुणसंगोऽस्य सदसद्योनिजन्मसु ||२१||

जे अनंग* तो पेंद्या* | निकवडा* नुसधा*
जीर्ण अतिवृध्दा- पासूनि वृध्द ||
तया आडनाव पुरुष | येऱ्हवी स्त्री ना नपुसंक
किंबहुना एक | निश्चयो नाहीं ||

a

-

शब्दांचे अर्थ-

(*निकण-फोल (*जवटे -जुळीं

(* अनंग-निराकार (*४पेंद्या - पांगळा

(*५निकवडा-दरिद्री. (*६नुसधा- केवळ एकटा

-

तो अचक्षु अश्रवण | अहस्त अचरण
रूप ना वर्ण |नाम आधी ||
अर्जुना काहींच जेथ नाहीं | तो प्रकृतिचा भर्तार पाहीं
की भोगणे ऐस याही |सुखदुःखाचे ||
तो तरी अकर्ता |उदास अभोक्ता
परि इया पतिव्रता | भोगविजे ||
जियेते अळुमाळ | रूपगुणांचा चाळढाळ
ते भलतैसाही खेळ |लेखा आणी ||
तया निराकाराचा आकार | तया निर्व्यापाराचा व्यापार
निरहंकाराचा अहंकार | होऊनि ठाके ||
तया अनामाचे नाम | तया अजाचें जन्म
आपण होय कर्म | क्रिया तया ||

तया निर्गुणाचे गुण |तया अचरणाचे चरण
तया अश्रवणाचे श्रवण | अचक्षूचे चक्षू ||
तया भावातीताचे भाव | तया निरवयवाचे अवयव
किंबहुना होय सर्व | पुरुषाचें हे ||
ऐसेनि इया प्रकृति | आपुलिया सर्वव्याप्ति
तया अविकाराते विकृती - | माजि कीजे ||
तेथ पुरुषत्व जें असे | तें ये प्रकृतिदशे
चंद्रमा अवसे | हरपला जेंवी ||
कां आंदोळलिया उदक | प्रतिमा होय अनेक
ते नानात्व म्हणती लोक | चंद्री जेवीं. ||
दर्पणाचिया जवळिका | दुजेपण जैसे ये मुखा
का कुंकूमे स्फटिका | लोहितत्व (*७) ये ||.
(*७ अर्थ-तांबडेपणा)
तैसा गुणसंगमे | अजन्मा हा जन्मे |
पावत ऐसा गमे | येर्हवीं नाहीं. ||
म्हणोनि केवळा पुरुषा | नाही होणे भोगणे देख
एथ गुणसंगचि अशेखा | लागीं मूळ ||

वासुदेवशास्त्री –- ज्ञानराज,माझ्या मनात काही शंका उद्भवल्या आहेत

ज्ञानेश्वर –- मग बोला.

वासुदेव –- पुरुष आणि प्रकृति ही एक आहेत, दोन नव्हेत हें भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला उपदेशिले असे आपण सांगता ; परंतु वेदांत आणि आजपर्यंतच्या भाष्यकारानी - मग ते द्वैतवादी असोत किंवा आपल्या प्रमाणेच अद्वैतवादी असोत प्रकृतीला माया असे समजून ती पुरुषाहून वेगळी आहे असे म्हटले आहे. आपण तर प्रकृतीला किंवा मायेला वेगळी मानीत नाही, हे कसे काय?

ज्ञानेश्वर –- माझ्या स्वतःच्या अंतःकरणाला जे प्रतीत झालं आहे ते असं आहे: परमेश्वर म्हणजेच पुरुष आणि हा परमेश्वरच प्रकृतीचही रूप घेतो. परमेश्वरच पुरुष आणि तोच प्रकृति असे असता ते दोन कसे होतील?

वासुदेव- म्हणजे आपण प्रकृतीला माया मानीत नाही?

ज्ञानेश्वर –- आतापर्यंतचे भाष्यकार आणि स्वतः वेद ज्या अर्थाने प्रकृतीला माया म्हणतात त्या अर्थाने प्रकृति ही माया आहे असे मला वाटत नाही! आतापर्यंतचे भाष्यकार प्रकृतीला द्वाड, अविद्यामय, दुष्ट आणि पुरुषाला मोहात पाडणारी असं मानतात आणि पुरुष हा तेवढा उत्तम, विद्यामय, प्रकाशमय आहे असं सांगतात. पण मला हा या दोघात केला गेलेला भेद, श्रेष्ठकनिष्ठपणा, उच्चनीचता मान्य नाही! ते दोघेहि एकांगाचे आहेत, एका योग्यतेचे आहेत, आणि दोघेहि

a

चारू स्थळी असून एकमेकांना पूरक आहेत - दोघांमुळे एक आहेत, असं
वाटतं! प्रकृति किंवा माया ही परमेश्वराचेच दुसरे रूप आहे!

वासुदेव –- मग परमेश्वराने हे दुसरे रूप घेतले तरी कोण्या कारणे?

ज्ञानेश्वर –- तीच तर गंमत आहे! या पुरुषाला म्हणजेच परमेशाला खेळण्याची -क्रिडेची आवड आली! अचल अशा त्या परब्रम्हाला हालचालीची आवड होणं हे सर्वस्वी उलटं होतं! त्या उलट्या आवडीच्या फंदात परब्रम्ह पडले ; क्रीडेसाठी - करमणुकीसाठी त्याने आपला वेष बदलला, रूप बदलले आणि पुरुष - प्रकृतीची व्यवस्था अस्तित्वात आली! अशा तऱ्हेने पुरुष आणि प्रकृति ही दोन्ही त्या एकाच परब्रम्हाची रूपे असल्यामुळे ती दोन असूनहि एक आहेत!

वासुदेव –- सारांश,प्रकृति म्हणजे परब्रम्हाची आवड!

ज्ञानेश्वर –- बरोबर आहे! पण एकच शब्द अधिक - उलटी आवड! परब्रम्हाला हवी तेव्हा ही आवड - ही प्रकृति प्रगट करता येते. हवी तेव्हा आवरून धरता येते! परमेश्वर हा मूळ निरूपाधिक, निर्लेप - कशातही न पडणारा ; पण या आवडीने - या प्रकृतीने त्याला हा संसार - ही

a

विश्वरचना करावयाला लावली! प्रकृति निर्माण झाल्याबरोबर पुरुष आणि प्रकृति ही पती-पत्नी झाली म्हणा ना! आणि ही दंपत्ती मोठी परस्परांवर गाढ प्रेम करणारी झाली! पत्नीला अलंकाराची आवड म्हणून या पुरुषालाच जगा एवढं स्वतः व्हावं लागलं! आणि जगा एवढं हे नामरुपाच लेणं पाहून ती ही खुश झाली!अशा तऱ्हेने त्या महाशून्य अशा पुरुषालाच नानारूप, नानाआकार, नाना नामे धारण करावी लागली; आणि सध्या त्यालाच आपण विश्वरचना असं संबोधतो! तात्पर्य त्या परब्रम्हाचा हा चिद्विलास आहे! हे सर्व निरूपण आता यापुढे क्रमशः येईलच. तरी अवधारावे :

उपद्रष्टाऽनुमंता च् भर्ता भोक्ता महेश्वर :|
परमात्मेति -

(श्लोकाच्या प्रारंभीच नारायणभटाच्या नेतृत्वाखाली भिकंभट्ट,शंकरभट,त्रंबकभट्ट, गणेशभट्ट इत्यादी मंडळी स्टेजवर जमा होते. आणि मग श्लोकार्ध पुरा झाल्यावर लगेच नारायणभट्ट ओरडून -)

नारायणभट्ट- एकदम थांबव ही संस्कृत - वाणी! यापुढे तुला ही देववाणी उच्चारिता यावयाची नाही!

(सभेत किंचित खळबळ. पुन्हा लगेच शांत.)

ज्ञानेश्वर –- संस्कृत भाषा उच्चारण्यास मला आडकाठी?

वासुदेव –- यांना विरोध?

काळू –- यांन्ला अडवणूक?

नारायण –- हो,हो! याला माझा विरोध आहे.

सर्वभट्ट :- हो-हो - याला आमचा विरोध आहे!

ज्ञानेश्वर :- पण का?

नारायण –- आक्षेप पहिला- तुला आम्ही ब्राह्मण मानावयाला किंवा द्विजसुद्धा समजायला कबूल नाही!

ज्ञानेश्वर- त्याचा निर्णय तुम्ही पैठणच्या न्यायासनावरून दिलेलाच आहे! त्यात तुम्ही नवीन काही ऐकवत नाही!

नारायण- पण तू तो निर्णय धाब्यावर बसवीत आहेस!

ज्ञानदेव –-. तो कसा काय?

नारायण- वेदांना स्पर्श करण्याची शूद्रांना अनुमती नाही.

ज्ञानेश्वर- कुणाची?

नारायण-शास्त्रांची! अर्थात् वेदवाणी उच्चारून तू शास्त्रांची अवज्ञा करीत आहेस!

ज्ञानेश्वर –-शास्त्रांचा आधार घेऊन तुम्ही हा निर्णय इथं मला ऐकविण्यापूर्वीच माझं वेदाध्ययन झालं आहे, त्याला काय करणार?

नारायण –- पण निर्णय ऐकल्यानंतर तरी वेदांना स्पर्श करण्याचं तू थांबविलं पाहिजेस!

ज्ञानेश्वर –- तुम्ही मला शूद्र समजता की काय?

नारायण –- तू कोण आहेस ते मला माहित नाही. पण तू ना ब्राह्मण, ना क्षत्रिय,ना वैश्य - एवढं मला ज्ञात आहे!

ज्ञानेश्वर- पण आपला गैरसमज होतो आहे!- मी वेदांवर टीका सांगत नसून गीतेवर टीका सांगत आहे!

a

नारायण –- मग गीता ही काय शुद्रांसाठी आहे? तो ही संस्कृत ग्रंथच आहे!

ज्ञानेश्वर –- इथंही आपली चूक होत आहे! गीता हा हिंदूंचा ग्रंथ आहे ; आणि सर्व हिंदूंसाठी आहे. गीतेच्या ठिकाणी 'द्विज' सौज्ञेतील वर्ग आणि शूद्र असा भेदभाव नाही!

नारायण –- असं कोण म्हणतं?

ज्ञानेश्वर –- मी म्हणतो.आणि कोणीही सुज्ञ हेच सांगेल!

वेदु संपन्न होय ठाई,परी कृपण ऐसा आनु नाही-
जो कानी लागला तिहीं, वर्णांच्याची!
येरा भवव्यता ठेलिया, स्त्रीशुद्रांदिकां प्राणिया,
अनवसरू मांडूनिया, राहिला आहे!
तरी, मज पाहता, ते मागील उणे, फेडावया गीतापणे,
वेदू वेठला भलतेणे, सेव्य होवावया!
यालागी मागिली कुटी, भ्याला वेदू,- गीतेच्या पोटी,
रिगाला - आता गोमटी, कीर्ती पातला!!
तैसे शब्दे जे न लभे, ते घडूनिया अनुष्टुभे,
स्त्रीशुद्रादिप्रतिभे, सामावले!
-आणि तोचि हा मी आता, श्रीव्यासांची पदे पाहता,
पाहता, आणिला श्रवणपथा मऱ्हाटिया!

नारायण –- हा! - हाच तर आमचा दुसरा आक्षेप आहे!

ज्ञानेश्वर –- कोणता दुसरा आक्षेप?

नारायण- कोणता?(वेडावीत) 'आणिला श्रवणपथा, मऱ्हाटिया.! संस्कृत ग्रंथ मऱ्हाटीत आणणे हा घोर अपराध आहे!!

काळू –- ग्यानराजा, मला वाईच सवड द्याल का? त्वांड वाकडं करून बोलणाऱ्या या बामणाचं त्वांड सदाचच वाकड करून टाकतो! योकच डाव ; आन ह्या हाताचा योकच रट्टा! आं? (सभेत पुन्हा काहीशी खळबळ)

ज्ञानेश्वर –- शांत रहा. शांत रहा! रेडेश्वरा, असा आततताईपणा करू नकोस! जोपर्यंत हे शब्दाने बोलत आहेत तोपर्यंत हातघाई नको! गुद्यावर आलेच तर तुझा रट्टा आहेच!

नारायण –- आमच्या साहित्यावर दरोडा घालून वर आम्हालाच धमकी देतोस काय? हा रेडा आम्हाला धमकी देण्यासाठी पदरी बाळवला आहेस काय?

काळू –- ये बामना त्वांड आवरून बोल! काय वाद घालायचा तो सरळपणान घाल!

वासुदेव –- नारायणभट्ट, आत्मज्ञानी ज्ञानराज आपल्यापुढे आहेत! त्यांना काळूचं शारीरिक सामर्थ्य उपयोजिण्याची काही आवश्यकता नाही! तुम्ही अगदी निर्धास्त रहा ; आणि यांच्याशी विषयाला धरून प्रतिवाद करा!

नारायण –- मी कुठे वादाचा मुद्दा सोडला आहे? याने मराठीत संस्कृत ग्रंथाचा जो अनुवाद चालविला ते शास्त्र विरोधी कृत्य आहे!

ज्ञानेश्वर- ते कसे काय?

काळू ‒- तुमच्या पोळीवर तूप पडत नाही म्हणून?
(सभेत हंशा. नारायणभट्ट चिडतो.)

ज्ञानेश्वर –- सांगा, मराठीत का नको?

नारायण –- (चिडलेल्या स्वरात) संस्कृत ही देववाणी आहे हे काय तुला ठाऊक नाही?

ज्ञानेश्वर –- मग मराठी ही काय चोरांची भाषा आहे?

नारायण –- पण संस्कृतमधलं ज्ञान त्या शूद्रांच्या भाषेत सांगणं हा देवद्रोह आहे! -अधर्म आहे!!

ज्ञानेश्वर –- देवद्रोह जर असेल तर मला देव शासन करतील! तुम्हाला त्या द्रोहाचं सोयर सुतक काय?

नारायण –- आम्ही त्या संस्कृत ज्ञानभांडाराचे रक्षणकर्ते आहोत! आम्हाला हे आमचं पवित्र कार्य पहायला नको काय?

भिकंभट्ट- आणि तुला तुझ्या मऱ्हाटीतच ग्रंथरचना करायची असली तर सुखनैव काही स्वतंत्र रचना कर ना!- पण तेवढी कुवत तुझ्या ठायी आहे कुठं म्हणा!- संस्कृत भाषेतील ज्ञानभंडारावर हात चालवून तू मऱ्हाटीची गुजराण चालवितो आहेस,!

ज्ञानेश्वर –- गुरुमाऊलीची कृपा असेल आणि आज्ञा होईल तर स्वतंत्र ग्रंथही लिहीन! पण गीतेवर मराठीत भाष्य करताना संस्कृतभाषेला विटाळ होतोच कसा?

नारायणा –- संस्कृताची विटंबना होत नाही तर काय उद्धार होतो आहे? संस्कृतातील विद्या - ती ब्रह्मविद्या आहे! शुद्रादिकांचा विटाळ होऊ

a

नये म्हणून ती संस्कृतात देवांनी सांगितली ती तू शूद्रांना सांगतोस! अशानं तिचा चांगला उद्धार होतो आहे,नाही?

ज्ञानेश्वर- (शांतपणे) हो,उद्धार होतो आहे. जितक्या अधिक लोकांना ती विद्या प्राप्त होईल तितका तिचा अधिक उपयोग होईल! तिच्यातलं शहाणपण कारणी लागेल! ज्ञान हे पवित्र आहे ना? पवित्र वस्तू एखाद्या अपवित्राकडे जाऊन पावित्र्य गमावीत असेल तर तिचं पावित्र्य ते काय? उलट पावित्र्याचा प्रभाव असा असतो की त्याच्या संगतीत जे येतात त्यांना ते पवित्र करतं! तुम्ही संस्कृतातल्या पवित्र ज्ञानाचा उपमर्द करीत आहात! एऱ्हवी तुम्ही ते ज्ञान लोकांच्या भाषेत लोकांना समजावून सांगून त्यांना पवित्र केलं असतं!- त्यांचा उद्धार केला असता!

नारायण –- चुकला - तुझा युक्तिवाद इथंच चुकला! ज्ञान मोठ राजाधिराज आहे! पावित्र्याचा मूर्तिमंत पुतळा आहे! मग या राजाधिराज पावित्र्याच्या मूर्तीला ज्या भाषेचं वस्त्र घालशील तीही उंची, पवित्र नको का? की त्या मूर्तीला गोणपाटानं किंवा लक्तरांनी गुंडाळून टाकशील? - राजाधिराज पवित्र ज्ञान, संस्कृतसारख्या वैभवशाली देववाणीच्या परिवेशांतच वेस्टिलेलं असणं उचित आहे!

a

ज्ञानेश्वर –- मग माझा मराठाची बोलू काय वैभवशाली नाही? -तो काय कमी आहे?

माझा मराठाची बोलू कौतुके | परी अमृतातेही पैजासी जिंके |
ऐसी अक्षरे रसिके |मेळवीन ||
जिए कोवळिकेचेनि पाडे | दिसती नादीचे रंग थोडे|
वेधे परिमळाचे बिक मोडे | जयाचे नि ||
ऐका रसाळपणाचिया लोभा | की श्रवणींचि होति जिभा|
बोले इंद्रियां लागे कळंभा | एकमेकां ||
सहजे शब्दु तरी विषो श्रवणाचा | परि रसना म्हणे हा रसु आमुचा |
घ्राणासि भावो जाय परिमळाचा | हा तोचि होईल ||
नवल बोलतीये रेखेची वाहणी | देखता डोळ्यांहीं पुरों लागे धणी!
ते म्हणती उघडली खाणी | रूपाची हे ||
जेथ संपूर्ण पद उभारे | तेथ मनचि धावे बाहिरें!
बोलू भजाही अविष्कारे | आलिंगावया ||
ऐशी इंद्रिये आपुलालिया भावी|झोंबती परि तो रसिसेपणेचि बुझावी|
जैसा एकला जग चेववी | सहस्त्रकरू ||
तैसे शब्दांचे व्यापकपण | देखिजे असाधारण |
पाहातया भावज्ञां फावती गुण | चिंतामणीचे ||

नारायणभट्ट –- (तन्मयतेने) वा,वा!वा -वा! काय वाणी आहे! काय साहित्य आहे!!

भिकमभट्ट –- (शंकरभट्टास कोपरखळी मारून) नारायणभट्टांचे लक्षण काही ठीक दिसत नाही भिकंभट्ट. आपण आता इथून काढता पाय घेतलेला, माझ्या मते, बरा|

शंकरभट्ट –-चला,भट्ट हो, चला पळा - (सर्वजण काढता पाय घेतात)

ज्ञानेश्वर –- का नारायणभट्ट?अजून काही आपले आक्षेप?

नारायणभट्ट –- आता आक्षेप नाहीत! माझी वाणीच मुकी झाली आपल्या या वाणीपुढं! अहाहा! - माझा मराठाचि बोलु कौतुके -

सर्वजण- माझा मराठाचि बोलु कौतुके! परि अमृतातेहि पैजासी जिंके|
ऐसी अक्षरे रसिके| मेळवीन ||

नारायण –- आता सर्व आक्षेप खुंटले! आता यापुढील सर्व तुमची भावार्थदीपिका श्रवण्याची इच्छा झाली आहे! तरी सर्व अपराधांची क्षमा करून काही श्रवण करण्याची अनुज्ञा द्यावी. (शिरसाष्टांग नमस्कार घालतात)

ज्ञानेश्वर –- नारायणभट्ट, उठा! तुम्ही आम्हाला नमस्कार करावा एवढी काही विशेष योग्यता माझी नाही.तुमचाच अधिकार थोर आहे! आपण ऐकतो म्हणता आहात तर माझी टीका ऐका, पण मी जे बोलणार आहे ते अखेर तुमचेच आहे!

नारायण –- आपण दिलेली अनुज्ञा ऐकून मला परमानंद झाला!

ज्ञानेश्वर –- आजच्या सभेचा वेळ आता संपत आला आहे.तेव्हा उरलेला विषय उद्या निरोपू -

नागदेव –- ग्यानदेवा! तू साक्षात- माऊली हायस! सर्वांच्या मनाला आनंद देणाऱ्या माऊली, या येड्याचंबी एक काम कर!

ज्ञानदेव –- बोल नागदेवा, तुझी इच्छा बोल!

नागदेव –- मी या माझ्या दोस्ताला माघारी न्याया आलो हाय. ह्याची बाइल तकडं धरणीवर पडण्याची येळ आलिया; आन् ह्यो तर हतंच तुमच्यासंग ऱ्हाईन म्हनतो. ह्याला काई बी सांगून माझ्यासंग धाडा.हीच माझी इच्छा आहे.

a

ज्ञानेश्वर –- त्याला जा म्हणून काही नव्याने सांगायला नको, नागदेवा! याने माझी गीतेवरची टीका अगदी पहिल्यापासून ऐकली आहे. प्रत्येकाचं कर्तव्य काय आहे, हे मी माझ्या व्याख्यानात सांगितलंच आहे. गुरूपदेश जर त्याला काही समजला असेल तर तो योग्य ते करीलच! काय रेडेश्वरा? काय म्हणायचंय तुला?

काळू –- आता वेगळं काय वाटायचंय? आपली सेवा कराया -

ज्ञानेश्वर –- ते ठीक आहे ; पण तुझ्या कर्तव्याच्या बाबतीत तू काय म्हणतोस? श्रीकृष्ण भगवानानी अर्जुनाला सांगितलेलं लक्षात आहे ना?

काळू –- गुरुदेवा सारं ध्येनात हाय -

म्हणौनि आइके पार्था | याचि परी पाहता
तुज उचित होय आता | स्वकर्म हे ||
आम्ही समस्तही विचारिले | तव ऐसेंचि मना आले |
जे न सांडीजे तुवा आपुले | विहित कर्म ||
म्हणौनि ज्ञातीवशे साचार | सहज असे जो अधिकार |
तो आपुलालिया शास्त्रे गोचर | आपण कीजे||

a

ज्ञानेश्वर –- मग आता शंका कसली? कशावर अडलं आहे? तुझ्या ज्ञातिमुळे तुझ्या वाट्याला आलेलं कर्म तू करायला आता सिद्ध असलं पाहिजे!

काळू - जशी आज्ञा गुरुदेवा! पण सबंध गीतेवरची आपली टीका ऐकल्यावर आपली आज्ञा घ्यावी म्हणतो!

ज्ञानेश्वर- ठीक आहे! काय नागदेवा?

नागदेव –- माझी काही ना न्हाई त्या गोष्टीला. उलट मीच म्हननार हुतो तसं! आता ही गोष्ट ह्येच्या बायकुला कळवून मी बी ह्येच्या संग सगळी टीका संपस्तोवर हंतच ऱ्हानार हाय!

ज्ञानेश्वर- खुशाल रहा. या रेडेश्वरानं श्रीकृष्ण भगवानानं सांगितलेला योग चांगला लक्षात घेतला आणि त्याप्रमाणं त्यानं वागण्याचं मला आश्वासन दिल, हे पाहून मलाही परमानंद झाला! आपापलं कर्म कुशलतेने करणे हाच खरा योग! आणि असं कर्म करणाराच खरा योगी! हा माझा रडेश्वरही त्या अर्थाने आता योगेश्वर झाला!

(रंगमंचावर एकदम अंधार होतो. स्टेजच्या समोर पांढरा स्वच्छ पडदा सोडला जातो. त्यामागे ज्ञानेश्वर,निवृत्ती,सोपान,मुक्ताबाई असे चौघे बसलेले असतात. नारायणभट्ट,

a

वासुदेवशास्त्री,काळू,नागदेव यांच्या सकट आणखी कितीतरी श्रोते त्यांच्यासमोर बसलेले दिसतात आणि हे सर्व दृश्य छायारूपाने पडद्यावर चित्रित करण्यात येते. मागील प्रकाश हळूहळू प्रखर होतो व छाया अधिक स्पष्ट होतात.

सर्व मंडळी –- माझा मराठाचि बोलु कौतुके | परि अमृतातेहि पैजासी जिंके| ऐसी अक्षरे रसिके |मेळवीन|| ही ओवी गंभीर आवाजात गाते आणि नंतर ज्ञानेश्वर पसायदान मागून घेतात.)

ज्ञानेश्वर –-

आता विश्वात्मके देवे | येणे वाग्यज्ञें तोषावे
तोषोनि मज द्यावे | पसायदान हे ||
जे खळांची व्यंकटी सांडो | तया सत्कर्मी रती वाढो
भूता परस्परे पडो | मैत्र जीवांचे ||
दुरितांचे तिमिर जावो | विश्व स्वधर्म सूर्ये पाहो
जो जे वांछिल तो ते लाहो | प्राणिजात ||
वर्षत सकळ मंगळी | ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ||
अनवरत भूमंडळी | भेटतु भूता ||
चला कल्पतरूंचे आरव | चेतनाचिंतामणीचे गाव |
बोलते जे अर्णव | पीयुषाचे ||
चंद्रमे जे अलांछन! मार्तंड जे तापहीन |
ते सर्वांही सदा सज्जन | सोयरे होतु |
किंबहुना सर्वसुखी | पूर्ण होऊनी तिही लोकीं
भजीजो आदिपुरखी | अखंडित ||

(वरील पसायदान मागून घेत असताना क्रमाने हळूहळू मागील प्रकाश अंधुक अंधुक होत जातो. व छायाही अस्पष्ट होते आणि शेवटी केवळ दिवटीतील ज्योत पेटलेली पडद्यामागून दिसते.)

**अंक ३ समाप्त**

----

**(लेखन प्रारंभ: ११-७-१९५५**
**लेखन समाप्ती: १३-१-१९५७)**

====================================

या नाटकाचे प्रयोग करू इच्छीणाऱ्यांनी कृपया संपर्क करावा

कुमुद्वती भोसले

पत्ता - प्लॉट नंबर 15, दीप सेवक सोसायटी, आर के नगर, कोल्हापूर. महाराष्ट्र.

संपर्क – व्हॉट्स ऍप क्र. ९९७०१०३३७८

Email : bhosalekumudwati@gmail.com

====================================

ई साहित्यवर अशीच अनेक नाटके वाचा

**नाटक (esahity.com)**

**फक्त एक क्लिक करा.**

**कै. पांडुरंग दे. सूर्यवंशी यांची ई साहित्यवरील या आधी प्रकाशित पुस्तकं(नाटकं)**

**कोणतेही पुस्तक कव्हरवर फक्त एक क्लिक करताच उघडेल**







